# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२७४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.२७ नोव्हेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## देशात १ जानेवारी २०२५ पासून केंद्र सरकारकडून ‘वन नेशन वन सबस्क्रिप्शन’ योजना लागू होणार

### काय आहे ‘वन नेशन, वन सबस्क्रिप्शन’ योजना, कोणाला होणार फायदा?

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.२७नवी दिल्ली**

वन नेशन वन सबस्क्रिप्शन असं वाचल्यावर अनेकांना वाटलं असेल की, ओटीटी प्लॅटफॉर्मच्या सबस्क्रिप्शनसंदर्भात केंद्र सरकारने योजना आणली की काय? सबस्क्रप्शन योजना असली, तरी ती ओटीटी प्लॅटफॉर्मसंदर्भात नाहीये. केंद्र सरकारने वन नेशन, वन सबस्क्रिप्शन योजनेला मंजुरी दिलीये. ही योजना शिक्षण क्षेत्राशी संबंधित आहे. नेमकी ही योजना काय आहे आणि त्यामुळे कोणाला फायदा होणार, हे जाणून घ्या.

ओएनओएस वन नेशन वन सबस्क्रिप्शन योजना शिक्षण संस्थासंदर्भात आणली गेली आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या अखत्यारित येणारी विद्यापीठे आणि शिक्षण संस्थांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रसिद्ध जर्नल्स म्हणजे मासिके, अनियतकालिके, संशोधन पत्रिका एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.




**वन नेशन वन सबस्क्रिप्शन योजना कशी करणार काम?**

ही योजना इन्फॉर्मेशन अ‍ॅण्ड लायब्ररी नेटवर्कच्या माध्यमातून लागू केली जाणार आहे. INFLIBNET जे विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे चालवले जाते. INFLIBNET ही प्रकाशकांना पैसे देईल आणि उच्च शिक्षण संस्थांना जर्नल्स सहजपणे पोहोचवले जातील.

**सध्या कसे आहे जर्नल्स सबस्क्रिप्शन?**

आतापर्यंत अनेक मंत्रालयाच्या अंतर्गत दहा-दहा वेगवेगळ्या लायब्ररी कन्सोर्टिया काम करत आहेत. त्याचबरोबर प्रत्येक शिक्षण संस्था त्यांच्या स्तरावर वेगवेगळ्या जर्नल्सचे सबस्क्रिप्शन घेतात. ओएनओएस योजनेमुळे सर्वच सरकारी उच्च शैक्षणिक संस्था म्हणजे केंद्रीय विद्यापीठे, राज्य विद्यापीठे, महाविद्यालये आणि महत्त्वाच्या राष्ट्रीय शिक्षण संस्थांना एकाच प्लॅटफॉर्मद्वारे आंतरराष्ट्रीय जर्नल्स मिळणार आहे. सरकारने या योजनेसाठी ६००० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. हे पैसे तीन वर्षांसाठी म्हणजे २०२५ ते २०२७ या काळात खर्च केले जाणार आहेत. योजनेतंर्गत ३० आंतरराष्ट्रीय प्रकाशकांची जवळपास १३ हजार जर्नल्स उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

ही सुविधा देशभरातली ६ हजार ३०० शिक्षण संस्थांना उपलब्ध करून दिली जाणार आहे. यात केंद्र, राज्य आणि इतर संशोधन करणाऱ्या शैक्षणिक संस्थांचा समावेश असणार आहे. ज्या संस्थांकडे पुरेसे संसाधने नाहीत, त्यांनाही आता जर्नल्स मिळू शकणार आहेत. प्रत्येक शैक्षणिक संस्थेला स्वतंत्रपणे जर्नल्स घेण्याची वेळ येणार नाही. यामुळे वेळेबरोबरच पैशांची बचत होणार आहे.

## सरकार स्थापनेसंदर्भात नरेंद्र मोदींनी घेतलेला निर्णय आम्हाला मान्य - एकनाथ शिंदे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातल्या पत्रकार परिषदेत सगळ्या पत्रकारांचं स्वागत केलं. निवडणुकीच्या निकालानंतर पहिल्यांदाच तुम्ही भेटत आहात. तुमच्या माध्यमांतून सगळ्या मतदारांचे आभार मानतो. हा जो विजय आम्हाला मिळाला तो अभूतपूर्व विजय आहे. गेल्या अनेक वर्षांत असा निकाल जनतेने दिलेले नाही. मागच्या अडीच वर्षात महायुतीने उत्तम काम केलं आहे. एकीकडे विकासकामं केली, महाविकास आघाडीने थांबवलेली कामं आम्ही पुढे नेली असंही एकनाथ शिंदे म्हणाले. तसंच दुसरीकडे कल्याणकारी योजना राबवल्या. विकास आणि कल्याणकारी योजनांची सांगड आम्ही घातली असंही एकनाथ शिंदे म्हणाले. महायुतीच्या सगळ्या कार्यकर्त्यांनी प्रचंड काम केलं आहे. मी कार्यकर्त्यांचेही आभार मानतो असंही एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातल्या पत्रकार परिषदेत सांगितलं.



मी लोकप्रियता मिळवण्यासाठी किंवा कुठलंही मोजमाप व्हावं म्हणून मी काम केलं नाही. तर सरकार म्हणून काय देऊ शकतो ते देण्याचा आम्ही प्रयत्न केला. तुम्ही घेतलेला निर्णय भाजपासाठी अंतिम असतो तसा आम्हालाही तो अंतिम आहे. एकनाथ शिंदेंची अडचण होणार नाही हे मोदी आणि अमित शाह यांना सांगितलं.

## मोदींकडून देवेंद्र फडणवीसांच्या नावाला पसंती शपथविधीची तारीखही जवळपास निश्चित



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

राज्यातील विधानसभा निवडणुकांचा निकाल जाहीर होऊन चौथा दिवस उजाडला तरीही अद्याप मुख्यमंत्रीपदाच्या नावावर शिक्कामोर्तब होताना दिसून येत नाही. त्यामुळे, महायुतीला एवढं बहुमत असतानाही मुख्यमंत्री का ठरत नाही, सरकार का स्थापन होत नाही, असा सवाल मविआच्या नेत्यांकडून उपस्थित केला जात आहे. त्यातच, मुख्यमंत्रीपदासाठी दिल्लीतून भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांचं नाव जवळपास निश्चित झाल्याची माहिती आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदींकडूनही देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला पसंती मिळाल्याची माहिती आहे.

राज्यात मुख्यमंत्री पदाच्या चर्चेवरुन राजकीय वातावरण तापलं असताना दिल्लीतून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर जवळपास शिक्कामोर्तब झालं आहे. मुख्यमंत्रीपदासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांच्याच नावाला पसंती दिली असून शुक्रवारी याबाबतची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. तसेच, नव्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी कार्यक्रम २ डिसेंबर रोजी होण्याची शक्यता विश्वसनीय सूत्रांकडून व्यक्त करण्यात आली आहे.

दरम्यान, देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजपने यंदाच्या विधानसभा निवडणुका लढवल्या असून मोठ्या संख्येने बहुमताचा आकडा गाठला आहे. भाजपने १३२ जागांवर यश मिळवल्याने भाजप समर्थकांचा उत्साह वाढला आहे. तर, महायुतीला तब्बल २३७ जागांवर जय मिळालं असून भाजप १३२, शिवसेना शिंदे गट ५७ आणि राष्ट्रवादी अजित पवार यांच्या पक्षाला ४१ जागा जिंकता आल्या आहेत. त्यातच, अजित पवार यांच्या राष्ट्रवादीनेही देवेंद्र फडणवीसांच्या नावाला पसंती देत मुख्यमंत्रीपदासाठी आपला पाठिंबा दिल्याची माहिती आहे. त्यामुळे, एकनाथ शिंदेंची नाराजी जास्त काळ राहिल असं दिसत नाही. कारण, अजित पवार व भाजप यांची एकूण जुळवाजुळव केल्यास बहुमताचा आकडा सहजच पार होत आहे.

## लोकसभेला ईव्हीएममध्ये दोष नव्हता का? बावनकुळेंचा विरोधकांना सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नागपूर**

विधानसभेतील पराभवानंतर महाविकास आघाडीचे नेते आता ईव्हीएमच्या विरोधात आंदोलन करणार आहे. लोकसभा निवडणुकीत त्यांना यश मिळाले त्यावेळी ईव्हीएम खराब नव्हती का असा प्रश्न प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. महाविकास आघाडीचा खोटारडेपणा समोर आल्यामुळे जनतेने महायुतीला मतदान केले आहे. ईव्हीएमवर अविश्वास व्यक्त करणे म्हणजे हा मतदारांचा अपमान आहे. आघाडीच्या नेत्यांना सध्या झोप लागत नाही. झोप लागेल तेव्हा ते शांत होतील, अशी टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.



चंद्रशेखर बावनकुळे नागपुरात आले असता ते प्रसार माध्यमांशी बोलत होते.

महाविकास आघाडीचा पराभवानंतर शरद पवार, नाना पटोले आणि उद्धव ठाकरे यांनी खरे तर आपण कुठे कमी पडलो याबाबत आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. मात्र आता ईव्हीएमवर पराभवाचे खापर फोडून ते आपले अपयश लपवत आहे. देशात व राज्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात महायुती चांगले काम करत आहे आणि करणार आहे हा विश्वास जनतेमध्ये निर्माण झाला आहे. त्यामुळे जनतेने आम्हाला कौल दिला. लोकसभा निवडणुकीच्यावेळी महाविकास आघाडीचे ३३ खासदार निवडून आले त्यावेळी ईव्हीएम चांगली होती का ? असा प्रश्न त्यांनी केला.

नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसचा खासदार विजयी झाला आहे. आम्हाला दीड हजार मते कमी पडली. त्या ठिकाणी ईव्हीएमचा घोळ झाला असेल तर ते निवडून कसे आले, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. पराभवातून काही गोष्टी शिकल्या पाहिजे. त्यावर आत्मचिंतन केले पाहिजे, मात्र त्यांची मानसिकता नाही. त्यांना पराभव पचवता येत नाही, असेही बावनकुळे म्हणाले.

## मुख्यमंत्रिपदाची शर्यत! अजित पवार निघाले शरद पवारांनीच मळलेल्या वाटेवर; दिल्लीत गाठीभेटी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ नवी दिल्ली**

महाराष्ट्रात महायुतीची पुन्हा सत्ता आली आहे. प्रचंड बहुमत असल्याने शिवसेना आणि भाजपात मुख्यमंत्री पदावरून रस्सीखेच सुरु आहे. या शर्यतीत अजित पवार कुठे आहेत, असा प्रश्न अनेकांना पडला आहे. अजित पवार यांनी ४१ जागा जिंकून शरद पवारांनीच वर्षानुवर्षे मळलेली वाट धरली आहे. मुख्यमंत्री पदाचे सोडा, जेवढी महत्वाची मंत्रिपदे पदरात पाडता येतील त्यासाठी अजित पवारांनी मोर्चेबांधणी सुरु केली आहे. या दोघांच्या वादात राष्ट्रवादी आपला फायदा करून घेण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



अजित पवारांनी सुनिल तटकरेंना दिल्लीत अमित शाह आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेण्यास लावली आहे. तत्पूर्वी तटकरेंनी फडणवीसांची देखील भेट घेतली आहे. मुख्यमंत्री पद सोडून जास्तीत जास्त महत्वाची खाती आपल्याकडे घ्यायची ही शरद पवारांची रणनिती होती. यासाठी त्यांनी जास्त जागा असूनही काँग्रेसलाच मुख्यमंत्री केले होते. तर अजित पवारांनी उपमुख्यमंत्रीच ठेवले होते.

अजित पवारांनी उपमुख्यमंत्री बनण्याचा विक्रम केला असे जरी बोलले जात असले तरी वाटाघाटीत अर्थखाते, महसूल, गृह खाते शरद पवारांनी आपल्याकडेच ठेवली होती. याला अजित पवार कंटाळले, अन्याय झाल्याचे बोलले जात असले तरी देखील अजित पवारांनी आताची राजकीय परिस्थिती पाहून शरद पवारांच्याच वाटेने जाण्यास प्राधान्य दिले आहे.

अजित पवार पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री होण्याची शक्यता आहे. तसेच महसूल, महिला व बाल कल्याण आदी खाती आपल्याकडे कशी घेता येतील यासाठी लॉबिंग करण्याची शक्यता आहे. याचबरोबर केंद्रातही एखादे मंत्रिपद मिळविता आले तर त्याकडेही अजित पवार गट प्रयत्न करत आहे.

## भाजपच्या मंत्र्यानं अजान ऐकून थांबवलं भाषण मंचावरूनच पठण केले ‘ला इलाहा इल्लल्लाह’

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ राजगड मध्यप्रदेश**

सध्या देशातील राजकीय वर्तुळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ‘एक हैं तो सेफ हैं’ आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या ‘बटेंगे तो कटेंगे’ घोषणांची जोरदार चर्चा सुरू आहे. अशातच मध्य प्रदेश सरकारमधील एका भाजपच्या मंत्र्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामध्ये अजान ऐकून भाषण थांबवणारे मंत्री हे मंचावरूनच ‘ला इलाहा इल्लल्लाह’ म्हणताना दिसत आहेत. यावरून पुन्हा राजकीय चर्चांना वेग आला आहे.



मध्य प्रदेशमधील डॉ. मोहन यादव सरकारमधील गौतम टेटवाल हे मंत्री आहेत. राजगढ जिल्ह्यातील मऊ गावात आयोजित एका कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी गौतम टेटवाल आले होते. गौतम टेटवाल हे भाषण करत असताना अजान सुरू झाली. अजान सुरू झाल्याचे ऐकताच गौतम टेटवाल यांनी भाषण थांबवले. ज्या वेळी हा कार्यक्रम होत होता, त्यावेळेस सव्वा सात वाजले होते आणि ईशाची नमाज होत होती.


अजान संपल्यानंतर मंत्री गौतम टेटवाल यांनी संस्कृतमधील एक श्लोक म्हटला. ते म्हणाले, वह कहता है कि उससे डरो, नेक काम करो। सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामया। सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखभाग् भवेत्।. यानंतर त्यांनी मंचावरूनच ‘ला इलाहा इल्लल्लाह मुहम्मदुर रसूल अल्लाह’, असेही पठण केले.

## अवकाशात पंच ग्रह दर्शन, खगोल प्रेमींसाठी अनोखी पर्वणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अकोला**

वर्षभर अवकाशात विविध खगोलीय घटना घडत असतात. कधी धुमकेतू दर्शन देतो, कधी उल्का वर्षावाची पर्वणी बघायला मिळते, तर काही वेळा ग्रहाण-सावल्यांचा खेळ सुरु असतो. खगोल प्रेमींसाठी आता आणखी एक अनोखी पर्वणी आहे. आकाशात नुसत्या डोळ्यांनी मंगळ, बुध, गुरु, शुक्र आणि शनी ग्रहांचे दर्शन होणार आहे. अवकाशातील या मनोहरी दृश्याचा आनंद घेण्याचे आवाहन विश्वभारती केंद्राचे प्रमुख प्रभाकर दोड यांनी केले.

हेमंत ऋतूतील गुलाबी थंडीत सध्या सर्वत्र उत्साह व आनंदाचे वातावरण आहे. अवकाशात ग्रहांच्या दर्शनाची उधळण होत असून खगोल प्रेमींकडून त्याचे हर्षोल्लासात स्वागत केले जात आहे. पश्चिम आकाशात संध्याकाळी सूर्यास्तानंतर सर्वात आधी धनु राशीतील तेजस्वी शुक्र ग्रह आपल्या नजरेस येईल. त्याच्या खाली सर्वात लहान ग्रह बुध क्षितिजावर काही वेळासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत पाहता येणार आहे. हे दोन्ही अंतर्ग्रह असल्याने यांच्या कलासुद्धा पाहता येणार आहेत. अंधाऱ्या भागातून शुक्राच्या प्रकाशात सावल्यासुद्धा दिसतील. रात्रीच्या प्रारंभी पूर्व आकाशात सूर्य मालेतील सर्वात मोठा असलेला सध्या वृषभ राशीतील गुरु ग्रह पृथ्वीच्या जवळ येत आहे.




अत्यंत ठळक चांदणीच्या स्वरुपात रोहिणी तारकेजवळ गुरु ग्रह बघता येईल. याच समृद्ध तारकांच्या भागात काही अंतरावर लालसर रंगाचा मंगळ ग्रह कर्क राशी समुहात दर्शन देईल, असे प्रभाकर दोड यांनी सांगितले.

पूर्व क्षितिजावरील गुरु आणि पश्चिम क्षितिजावर शुक्र बघताना दक्षिण आकाशात क्षितिजापासून सुमारे ६० अंश अंतरावर सूर्यमालेतील सर्वात सुंदर व वलयांकित असलेला शनी ग्रह कुंभ राशीत दिसणार आहे. दुर्बिणीतून गुरु ग्रहाचे आणि शनी ग्रहाचे वलय खुपच सुंदर दिसते. सूर्य, पृथ्वी आणि शनी यांच्यातील स्थितीनुसार शनी ग्रहाचे वलय एका रेषेत आल्याने दोन महिन्यांनंतर वलय काही कालावधीसाठी दिसेनासे होईल, अशी माहिती प्रभाकर दोड यांनी दिली.

## सत्तेत असावे की, सत्तेबाहेर? बच्चू कडूंनी जनतेलाच विचारला सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती**

राज्यात नुकत्याच विधानसभा निवडणुका पार पडल्या. यात महायुतीशी थेट लढत असलेल्या महाविकास आघाडीची दाणादाण झाली. तर छोटे पक्ष पालापाचोळ्यासारखे उडाले. बच्च कडू यांच्या नेतृत्वाखाली प्रहार जनशक्ती पक्षालाही मोठ्या पराभवाला सामोरं जावं लागलं असून, बच्च कडू यांनाही मतदारांनी झटका दिला. त्यानंतर आता बच्चू कडूंनी पुढील राजकीय वाटचालीला सुरूवात केली आहे. पुढील काळात प्रहारने आपला राजकीय प्रवास कसा करावा, या विषयी आपले मत काय? प्रहारचा सेवेचा झेंडा यावेळी खाली आला. पुढील काळात प्रहारने आपला राजकीय प्रवास कसा करावा, याविषयी आपले मत काय? सत्तेमध्ये सहभागी असावे की सत्तेबाहेर? धर्म-जात याचा झेंडा हाती घ्यावा की सेवेचा वसा सुरू ठेवावा?, असे प्रश्न बच्चू कडू यांनी विचारले असून, जनतेकडून याबद्दल सूचना मागवल्या आहेत.



## संपादकीय ......

# शरद पवार यांच्या प्रभावाची पीछेहाट

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला विधानसभा निवडणुकीत जबरदस्त तडाखा बसला आहे. खुद्द त्यांच्या शत्रूलाही कल्पना करता येणार नाही, एवढा मानहानिकारक पराभव त्यांच्या पदरी पडला आहे. गेल्या साठ-पासष्ठ वर्षांपासून शरद पवार राज्याच्या राजकारणात वावरत आहेत. दीर्घ काळापासून त्यांची इथल्या राजकारणावर पकड आहे आणि तरीही त्यांना या निवडणुकीत मोठ्या अपयशाला सामोरे जावे लागले आहे. राजकारणातील त्यांच्या प्रभावाची ही पीछेहाट केवळ अनपेक्षित म्हणता येणार नाही. त्यांच्या राजकारणाने आजवर जी वळणे घेतली, त्याच वळणांनी त्यांना कात्रजच्या अर्थात घसरणीच्या घाटावर आणून सोडले आहे, असाच निष्कर्ष काढावा लागतो.

गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत शरद पवार यांनी प्रथम पद्धतशीरपणे उद्धव ठाकरे यांना भारतीय जनता पक्षापासून बाजूला करीत दोन्ही काँग्रेससह सत्ता स्थापन केली. त्याआधी भाजपकडे गेलेल्या आपल्या पुतण्याला अजित पवार यांना परत स्वगृही आणले. ही त्यांची खेळी अडीच वर्षांतच उलटली आणि शिवसेनेतच फूट पडून भाजपने शिंदे शिवसेनेच्या साथीने सत्ता काबीज केली. पवारांच्या चाणक्यनीतीला हा पहिलाच धक्का होता. पुढे वर्षातच पुतणे अजित पवारांनी खुद्द पवारांचाच पक्ष फोडला आणि ते भाजपबरोबर सरकारात सहभागी झाले. हा पवारांना दुसरा जबर धक्का होता; पण मुत्सद्दी पवारांना त्यातून भविष्यात काय घडेल, याचा अंदाज आला नाही, असेच आता निकालावरून म्हणावे लागेल. खरे तर गेल्या १५-२० वर्षांपासूनच अजित पवार आपली नाराजी सातत्याने दर्शवीत होते. मुख्यमंत्रिपदाची संधी येऊनही ती नाकारली गेल्याची त्यांना खंत होती व ती खासगीत व्यक्तही होत होती. पहाटेच्या शपथविधीतून त्यांची ही महत्त्वाकांक्षा उघड होऊनही त्याची फारशी दखल घेण्यात शरद पवार कमी पडले, किंबहुना अन्य काही कारणासाठी त्यांनी पुतण्याच्या अपेक्षांना धूप घातला नाही, असेच म्हटले पाहिजे.

देशाच्या राजकारणात काँग्रेसपासून समाजवादी पक्षापर्यंत अनेक पक्षांत फूट पडली; पण ही फूट तात्त्विक पायावर होती. व्यक्तिगत स्वार्थासाठी कोणी पक्ष फोडले नाहीत; पण १९७८ साली पुलोदचा प्रयोग करताना आणि १९९९ मध्ये काँग्रेसशी फारकत घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसची वेगळी चूल मांडताना शरद पवार यांनी कोणती तात्त्विक भूमिका घेतली, हे तपासावेच लागेल. त्यामुळेच गेल्या दोन दशकांतील फोडाफोडीच्या ज्या घडामोडी झाल्या, त्याचे जनक शरद पवारच आहेत, अशीच इतिहासात नोंद होईल. त्यांनी निर्माण केलेल्या पायवाटेतून महामार्ग झाला आणि त्याच त्यांच्या करणीतून आपलाच पक्ष फुटल्याचे त्यांच्या नशिबी आले. हा 'पोएटिक जस्टिस' म्हणावा लागेल.

शरद पवार यांनी आपल्या सोबत जे पक्ष घेतले, त्यांचा र्हास झाला, असाच इतिहास आहे. त्यांच्या सोबत 'पुलोद'च्या सत्तेत सहभागी झालेला शेतकरी कामगार पक्ष आता नावापुरताच उरला आहे, तर समाजवादी पक्ष औषधापुरताही शिल्लक नाही. विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि काँग्रेस यांची वाताहत झाली. शरद पवार यांच्या यापूर्वीच्या दाखल्याचीच यावेळी पुनरावृत्ती झाली आहे, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

लोकसभा निवडणुकीवेळी महाविकास आघाडीने चांगले यश मिळवले. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने १० जागा लढवल्या होत्या आणि त्यापैकी आठ जागांवर यश मिळविले होते. तेव्हा त्यांचा स्ट्राईक रेट ८० टक्के एवढा होता. याउलट विधानसभा निवडणुकीत त्यांनी ८६ जागा लढवल्या. यावेळी त्यांचा स्ट्राईक रेट साडेअकरा टक्क्यांच्या आसपास एवढा कमी झाला. ही घसरगुंडी का झाली, याचे उत्तर त्यांच्या आजवरच्या राजकीय वाटचालीशी सुसंगत असेल, हे वेगळे सांगायला नको.

बारामती हे पवारांचे संस्थान म्हटले जाते. ते या संस्थानाचे अनभिषिक्त राजे म्हणवले जातात. लोकसभा निवडणुकीत पुतणे अजित पवार यांच्याशी त्यांचा रणसंग्राम झाला. त्यात त्यांच्या कन्या सुप्रिया सुळे विजयी झाल्या; पण विधानसभा निवडणुकीत पुतणे अजित पवार यांच्या विरोधात अजित पवारांचे पुतणे युगेंद्र यांना उभे करण्याची त्यांची खेळी अंगलट आली. यावेळी पुतण्याने काका शरद पवार यांच्यावर मात केली.

## भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त

# विद्यापीठात संविधान शिल्पाचे लोकार्पण



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संविधान शिल्प, संविधान उद्देशिका व संत गाडगे बाबांच्या दशसूत्री संदेशाचे लोकार्पण कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते आज करण्यात आले.कुलगुरू डॉ. बारहाते यांनी संविधान शिल्पाचे लोकार्पण झाल्याची घोषणा केली. मार्गदर्शन करतांना ते म्हणाले, भारतीय संविधानाला ७५ वर्ष पूर्ण झालेली आहे. संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आपण लोकशाहीचा उत्सव साजरा करीत आहोत. महाराष्ट्रामध्ये केवळ अमरावती विद्यापीठामध्ये संविधान शिल्प उभारल्या गेले, याचा आम्हां सर्वांना अभिमान वाटतो. अधिसभा सदस्य डॉ. संतोष बनसोड यांनी मांडलेला प्रस्ताव अधिसभा व व्यवस्थापन परिषदेने मान्य केला आणि त्याची कार्यपूर्ती अभियांत्रिकी विभागातील कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे व त्यांच्या चमूने अथक परिश्रम घेवून पूर्ण केली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाहीची मूल्ये संविधानातून दिली असून कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांनी मानवतेची मूल्ये दशसूत्रीतून दिलेली आहे. संविधान शिल्पाच्या माध्यमातून या दोनही महापुरुषांनी दिलेल्या मूल्यांची सांगड घालण्याचा प्रयत्न येथील नागरिक, समाज व विद्यार्थी यांना दिशादर्शक व प्रेरणादायी असणार आहे. संविधानाची उद्देशिका व संत गाडगे बाबांचा दशसूत्री संदेश यातील स्पिरीट सारखेच आहे. ''एक दिवस संविधानाकरीता'' हा उपक्रम विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये संविधान दिनानिमित्त आयोजित करण्याचे निर्देश विद्यापीठाने दिले असून, त्यानिमित्त सर्व विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जनजागृती होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. संविधान शिल्पाच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांना उर्जा व प्रेरणा मिळेल, असे सांगून त्यांनी संविधान दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्यात. प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे मनोगत व्यक्त करतांना म्हणाले, भारतात स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्याय ही लोकशाहीची मूल्ये संविधानामुळे भारतीयांमध्ये रुजली आहे. लोकशाही अधिक बळकट करण्याचे कार्य संविधानाच्या माध्यमातून होत आहे. सर्वांनी यापासून प्रेरणा घ्यावी, असेही ते म्हणाले. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाला व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, आय.आय.एल. संचालक डॉ. अजय लाड, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, अधिसभा सदस्य डॉ. संतोष बनसोड, डॉ. रविंद्र मुन्द्रे, डॉ. प्रशांत विघे आदी उपस्थित होते.संविधान शिल्पाचे लोकार्पण झाल्यानंतर राष्ट्रगीत व विद्यापीठ गीत सादर करण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कर्मयोगी श्री संत गाडगे बाबांच्या प्रतिमेला हारार्पण, पुष्पार्पण मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. पुस्तक देवून याप्रसंगी स्वागत झाले. प्रास्ताविकतेतून कुलसचिव डॉ. असनारे यांनी संविधान शिल्प लोकार्पण सोहळा आयोजनामागील भूमिका मांडली, तर अधिसभा सदस्य डॉ. बनसोड यांनी अधिसभेत मांडलेल्या प्रस्तावाविषयी माहिती दिली. श्री सर्जेराव गलपट यांनी संविधानावर कविता सादर केली. संचालन डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा अभ्यासक्रमाचे समन्वयक डॉ. रत्नशील खोब्राागडे यांनी, तर आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी मानले. कार्यक्रमाला सर्व संवैधानिक अधिकारी, विविध प्राधिकारिणींचे सन्माननीय सदस्य, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, नागरिक व विद्यार्थी मोठए संख्येने उपस्थित होते.

# तुरीवरील शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी करा हे सोपे उपाय

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक**

तूर पिकाच्या उत्पादनात घट आणणाऱ्या अनेक कारणांपैकी किडींचा प्रादुर्भाव हे मुख्य कारण आहे. सध्या तूरपीक फुलोऱ्यावर व शेंगा धरण्याच्या अवस्थेत आहे. या काळात शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होऊ शकतो.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**किडीची ओळख**- या किडीचा पतंग शरीराने दणकट व पिवळसर रंगाचा असतो.

- अंडी पिवळसर पांढऱ्या रंगाची व गोलाकार असतात.

- या अंडीचा खालील भाग सपाट असून पृष्ठभाग घुमटाकार असतो.

- कोष गडद तपकिरी रंगाचा असतो.

- मादी नरापेक्षा मोठी असून तिच्या शरीराच्या मागील भागांवर केसांचा झुपका असतो.

नुकसानीचा प्रकार

- अंडीतून बाहेर पडलेल्या अळ्या सुरुवातीस सुस्त असून प्रथम कोवळी पाने व देठे कुरतुडून खातात.

- अळी लहान असतांना कळी फुलोऱ्यावर तर मोठी अळी मुख्यत: शेंगावर आक्रमण करते.

- ही अळी शेंगावर अनियमित आकाराचे छिद्र पाडून अर्धी आत व अर्धी बाहेर राहून शेंगातील दाणे खाते.




**कसे कराल व्यवस्थापन**

१) पिकात हेक्टरी १० कामगंध सापळे उभारावेत, यामुळे या अळीचे सर्वेक्षण व काही प्रमाणत नियंत्रण करण्यास मदत होईल.

२) शेतात पक्षांना बसण्यासाठी मचाण म्हणजेच इंग्रजी टी आकाराचे पक्षी थांबे ३० ते ४० प्रती हेक्टर उभारावेत.

३) सुरुवातीच्या काळात प्रादुर्भाव कमी असल्यास ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.

४) तुरीमधील शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये घाटे अळी/पिसारी पतंग व शेंग माशी यासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन पध्दतीने नियंत्रण करावे यामध्ये तृणधान्याचे आंतरपिक असल्यास कीडीचे प्रमाण कमी राहण्यास मदत होते.

५) एचएन.पी. व्ही (क्छझत) या जैविक कीड नियंत्रकाचा वापर करावा

६) फुलकळी लागताना पहिली फवारणी निंबोळी अर्क ५% दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर १२ ते १५ दिवसांनी हेलीओकील (क्छझत) ५०० मिली ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टर फवारणी करावी.




## दृष्टिक्षीणतेने त्रस्त आहात?

**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक** - संगणकीय कामकाजाचे वाढते प्रमाण, स्मार्टफोनचा अतिवापर आणि एकंदरीत बदललेली जीवनशैली यामुळे डोळ्यांच्या आरोग्यावर अनेक प्रकारचे प्रतिकूल परिणाम होत आहेत. त्यातून दृष्टिक्षीणता किंवा नेत्रक्षीणतेचा त्रास असणार्यांची संख्या वाढत आहे.



नेत्रक्षीण रुग्णांनी आरोग्यवर्धिनी नेत्ररक्षावटी आणि चंद्रप्रभा प्रत्येकी तीन गोळ्या दोन वेळा चावून खाव्यात. महात्रैलघृत दोन चमचे सकाळी आणि सायंकाळी खावे. योगवाही त्रिफळाचूर्ण एक चमचा रात्री एक चमचा तूप मधाचे मिश्रणाबरोबर घेणे. योग्य नंबरचा चष्मा लावावा. तसेच शतावरीघृत दोन वेळा पोटात घेणे. शतधौतघृत कपाळ, कानशिले, तळपाय, तळहाताला चोळावे. गाईच्या दुधाचा नेत्रबस्ती, करावा. द्राक्षे आणि आवळ्याच्या ऋतूमध्ये ताजी द्राक्षे आणि आवळे जरूर खावे. काळ्या मनुका खाव्या. सकाळी एक चमचा रसायनचूर्ण घ्यावे. शतावरीकल्प किंवा च्यवनप्राश अनुक्रमे तीन किंवा दोन चमचे दोन वेळा घ्यावे, वर दूध प्यावे.

विशेष दक्षता अणि विहार : डोळ्यास कफापासून विशेष जपावे. कफकारक पदार्थ, गार हवा, वारे, यांचेपासून लांब राहावे. वेळोवेळी डोळ्यांची तपासणी करावी. जागरण, रात्री वाहनातून प्रवास, उपास टाळावा. या गोष्टी तसेच फाजील जेवण यामुळे दृष्टीला धोक असतो.

पथ्य : दुध्याभोपळा, कारले, पडवळ, दोडका, गाईचे तूप, मूग, कोथिंबीर, मनुका, गाईचे दूध, शेवगा, सुरण यांनी युक्त असा आहार असावा. याखेरीज अंजीर, द्राक्षे, शेवग्याचा पाल्याची भाजी, चाकवत, मुळा, हातसडीचे तांदूळ, कडधान्ये यांचा आहारात समावेश असावा.

कुपथ्य : तिखट, आंबट, खारट, आंबवलेले पदार्थ, अति ऊन, समोरून येणारा वारा, गार हवा, अति वेगाच्या वाहनात प्रवास, अति आणि सूक्ष्म वाचन टाळावे.

रुग्णालयीन उपचार : घरी पूर्ण विश्रांती मिळत नसल्यास, 'बेड रेस्ट' करिता प्रवेशित रुग्ण व्हावे. फाजील वाचन बंद करावे. साध्या पाण्याच्या चुळा भराव्या. टीव्ही सतत पाहू नये. झोपून किंवा वाहनांत प्रवासात वाचन करू नये.

# आरोपींना दोन दिवसात अटक करा, अन्यथा आंदोलन

## माजी आ. यशोमती ठाकूर यांचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ तिवसा-** अट्रॉसिटी गुन्हा दाखल असताना आरोपीनां रात्रीच सोडल्या जाते म्हणजेच पोलीसांवर राजकीय दबाव आहे हे निश्चित. परंतु पोलीसांनी आरोपीनां पाठीशी घालू नये अन्यथा गाठ माझ्याशी आहे, असा इशारा माजी आमदार यशोमती ठाकूर यांनी पोलीसांनां दिला.

तिवसा येथील सामाजिक कार्यकर्ते गजानन रामटेके यांची त्यांनी भेट घेतली. यावेळी दिलीप काळबांडे, नगराध्यक्ष योगेश वानखडे, माजी नगराध्यक्ष वैभव वानखडे, माजी नगरसेवक नरेंद्र विघ्ने, शहर अध्यक्ष शेतू देशमुख, कॉ. दिलीप शापामोहन तसेच काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थितहोते.



भाजपचे आमदार राजेश वानखडे यांच्या विजयी रॅली दरम्यान भिडेच्या वीस ते पंचवीस समर्थकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर घोषणाबाजी केल्याने याठिकाणी कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. यावेळी आंबेडकरी कार्यकर्ते गजानन रामटेके यांना मारहाण झाल्यामुळे संपूर्ण आंबेडकरी समाजामध्ये संतापाची लाट उसळली आहे. यावेळी आरोपीवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी तिवसा पोलीस स्टेशनं समोर मोठा जमाव जमला होता. आरोपीनां दोन दिवसात आरोपीना अटक न केल्यास आम्ही रस्त्यावर उतरू असाही इशारा यावेळी यशोमती ठाकूर यांनी दिला.

# सुरळीत वीज पुरवठ्यासाठी...कृषिपंपांना कॅपॅसिटर बसवा ; ऑटोस्विच टाळा महावितरणचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ अमरावती** वीज पुरवठा सुरू झाल्यानंतर कृषिपंप तत्काळ सुरू करण्याच्या उद्देशाने ग्राहकांनी कृषिपंपाना ऑटोस्विच बसविले आहेत. त्यामुळे परिसरातील सर्व कृषिपंप एकाच वेळी सुरू होऊन रोहित्रावरील भार अचानक वाढतो. परिणामी रोहित्र जळणे, वीजवाहिन्या बंद वा नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढते. यातून होणारी गैरसोय व नुकसान टळावे तसेच सुरळीत व योग्य दाबाचा वीजपुरवठा मिळावा, यासाठी शेतकऱ्यांनी कृषिपंपांना ऑटोस्विचऐवजी कॅपॅसिटर बसवून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणच्या अमरावती परिमंडलाच्या वतीने करण्यात आले आहे.

**कॅपॅसिटरची गरज का ?**

प्रत्येक कृषिपंपास क्षमतेनुसार कॅपॅसिटर बसविणे हा रोहित्र जळणे वा नादुरुस्त होण्याचे प्रमाण आटोक्यात आणण्यासाठी एक सोपा उपाय आहे. कॅपॅसिटरमुळे कमी दाबाचा वीजपुरवठा, रोहित्र जळाल्यास वा नादुरुस्त झाल्यास दुरुस्ती कालावधीतील खंडित वीजपुरवठा या समस्या सुटण्यास मदत होणार आहे. मात्र बहुतांश ग्राहकांनी कृषिपंपास कॅपॅसिटर बसविलेले नाहीत. बसविलेल्यांपैकी काहींचे बंद तर काहींनी थेट जोडणी केली आहे. त्यामुळे ज्यांनी कॅपॅसिटर बसविले नाहीत त्यांनी ते बसवून घ्यावेत आणि कॅपॅसिटर बंद किंवा थेट जोडणी असल्यास ते दुरुस्त करून घ्यावेत. कृषी क्षेत्रातील कार्यक्षम ऊर्जा वापरात कॅपॅसिटर हे उपकरण महत्त्वाचे आहे. कृषिपंपास कॅपॅसिटर बसविल्यामुळे विद्युत केबल जळण्याचे प्रमाण कमी होते. योग्य विद्युतदाब, केव्हीए मागणी, वीज वापरात बचत आदी फायदे होतात. पुरेशा दाबाने वीजपुरवठा मिळतो, कृषिपंप जळण्याचे प्रमाण कमी होते. तसेच रोहित्रांवरील भार ३० टक्क्यांने कमी होऊन रोहित्र नादुरुस्तीचे व जळण्याचेही प्रमाणही कमी होते. यामुळे शेतकर्यांना योग्य दाबाचा, अखंडित व सुरळीत वीजपुरवठा मिळेल. या सर्वांचा लाभ शेतकर्यांना होणार असल्यामुळे त्यांनी 'कॅपॅसिटर'चा वापर करावा,.

**ऑटोस्विचचा वापर टाळावा** - राज्यात ४५ लाखांहून अधिक कृषिपंपधारक शेतकरी आहेत. महावितरणकडून या शेतकर्यांना दिवसा व रात्री अशा चक्राकार पद्धतीने वीजपुरवठा करण्यात येतो. हा वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर शेतात जाऊन कृषिपंप चालू करण्याचा त्रास वाचवण्यासाठी राज्यात अनेक ठिकाणी शेतकर्यांनी कृषिपंपांना 'ऑटोस्विच' लावले आहेत. त्यामुळे वीज येताच कृषिपंप आपोआप चालू होतो. परिणामी रोहित्रांवरील भार एकाचवेळी वाढत असल्याने रोहित्र जळण्याचे किंवा नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढत आहे. ऐन हंगामात रोहित्र जळाल्यास त्याची झळ शेतकर्यांनाही सोसावी लागते. हे टाळण्यासाठी शेतकर्यांनी कृषिपंपांना 'ऑटोस्विच' लावू नये तसेच इतर शेतकर्यांनी ते लावले असल्यास ते काढून टाकण्याची विनंती करावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.-

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २७ नोव्हेंबर २०२४ | शहर/ग्रामिण


## तीन आमदारांना मंत्रिपदाचे वेध! कुणाची लागणार वर्णी ?





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती :** जिल्ह्यातील आठपैकी सात जागांवर महायुतीने विजय संपादन करून जिल्ह्याच्या राजकारणावर वर्चस्व प्रस्थापित केले आहे. आता नव्या सरकारमध्ये महायुतीमधून मंत्रिपदासाठी तीन जणांची दावेदारी पुढे आली आहे. यात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या सुलभा खोडके, युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा आणि भाजपचे प्रताप अडसड यांचा समावेश आहे. विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यातील काँग्रेसचे वर्चस्व उध्वस्त करीत महायुतीच्या उमेदवारांनी घवघवीत यश संपादन केले. धामणगाव रेल्वे, तिवसा, अचलपूर, मेळघाट आणि मोर्शी या पाच मतदारसंघांत भाजपने तर अमरावतीत राष्ट्रवादी काँग्रेसने आणि बडनेरात युवा स्वाभिमान पक्षाने यश मिळवले.

रवी राणा हे चौथ्यांदा निवडून आले आहेत. या निवडणुकीत भाजपने त्यांना बळ दिले असले, तरी त्यांनी अमरावती आणि दर्यापूरमध्ये महायुतीच्या धर्माचे पालन केले नाही, अशी टीका त्यांच्यावर झाली. अमरावतीत महायुतीच्या उमेदवार सुलभा खोडके यांना पाठिंबा देण्याऐवजी माजी खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणांनी भाजपचे बंडखोर उमेदवार जगदीश गुप्ता यांचा प्रचार केला. खोडके आणि राणा दाम्पत्यातील राजकीय संघर्ष जुना असला, तरी आता दोघेही महायुतीचे घटक आहेत. त्यामुळे मंत्रिपदाच्या शर्यतीत देखील या संघर्षाचे प्रतिबिंब झळकेल, असे संकेत आहेत.

लोकसभा निवडणुकीत विरोध केला, हे कारण पुढे करून राणा दाम्पत्याने अमरावतीत खोडके यांच्या तर दर्यापुरात शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे अभिजीत अडसूळ यांच्या विरोधात भूमिका घेतली. त्यावरून एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी राणा यांना समजही दिली होती. पण, त्यांनी विरोधी भूमिका कायम ठेवली. राणा हे देवेंद्र फडणवीस यांच्या निकटचे समजले जातात, त्यामुळे मंत्रिपदाच्या शर्यतीत त्यांचे नाव पुढे आहे.

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते संजय खोडके हे अजित पवारांच्या निकटचे. पक्षाची निवडणुकीतील व्यूहरचना आणि धोरणात्मक निर्णयात त्यांच्या शब्दाला किंमत दिली जाते, त्यामुळे सुलभा खोडके यांना मंत्रिपद मिळावे, यासाठी अजित पवार समर्थक आग्रही आहेत. भाजपचे प्रताप अडसड हे दुसऱ्यांदा आमदार झाले आहेत. गेल्या निवडणुकीत ते जिल्ह्यात निवडून आलेले भाजपचे एकमेव आमदार होते. त्यांनाही मंत्रिपदाची आस आहे.

मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांनी सहा महिन्यांपूर्वी काँग्रेसमधून भाजपमध्ये प्रवेश केला होता. २००९ मध्ये केवलराम काळे काँग्रेसच्या उमेदवारीवर आमदार बनले होते. मोर्शीचे आमदार उमेश यावलकर, अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे आणि तिवसाचे आमदार राजेश वानखडे हे प्रथमच निवडून आले आहेत.

### भाजपचे राज्य कार्यकारिणीचे सदस्य नळकांडे म्हणतात ....

## नवनीत राणा, डॉ. बोंडेंची पक्षातून हकालपट्टी करा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती :** राज्यात महायुतीने दमदार कामगिरी केली असून जिल्ह्यातील आठ जागांपैकी सात जागा महायुतीने जिंकल्या आहेत. मात्र, दर्यापुरातील जागा गमवावी लागली. यावरून भाजपमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे दर्यापुरातील उमेदवार अभिजीत अडसूळ यांच्या पराभवासाठी भाजपच्या नेत्या नवनीत राणा, भाजपचे खासदार डॉ. अनिल बोंडे आणि आमदार प्रकाश भारसाकळे हे जबाबदार असल्याने भाजपने त्यांची पक्षातून हकालपट्टी करावी, अशी मागणी भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य आणि श्रमराज्य परिषदेचे अध्यक्ष अरविंद नळकांडे यांनी केली आहे.

राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रीद्वय देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या नेतृत्वात महायुतीची अधिकृत उमेदवारी अभिजीत अडसूळ यांना जाहीर झाल्यानंतर या निवडणुकीत युतीधर्माचे पालन न करता रमेश बुंदिले हे युवा स्वाभिमान पक्षातर्फे निवडणुकीच्या रिंगणात उभे उतरले. बुंदिले यांच्यावर भाजपने तत्काळ कारवाई करून त्यांची पक्षातून हकालपट्टी देखील केली होती. याची नोंद घेऊन दर्यापूर मतदारसंघातील भाजपसह महायुतीचे सर्व नेते आणि कार्यकर्ते अभिजीत अडसूळ यांच्या विजयासाठी जिवाचे रान करीत असताना पक्षातून निष्कासित झालेल्या रमेश बुंदिले यांच्या संपर्क कार्यालयावर आणि प्रचार-प्रसार



पत्रकांवर भाजपचे जिल्हाध्यक्ष आणि खासदार डॉ. अनिल बोंडे, भाजपचे आमदार प्रकाश भारसाकळे आणि माजी खासदार नवनीत राणा यांची छायाचित्रे झळकत होती, यावर आपण आक्षेप नोंदवला होता, असे अरविंद नळकांडे यांनी सांगितले आहे.एकतर बुंदिले यांच्या कार्यालयावरील फलके आणि पत्रकांवरील भाजपच्या नेत्यांची छायाचित्रे हटविण्याचे आदेश द्यावेत किंवा ती छायाचित्रे प्रसिद्ध करण्याची परवानगी देणाऱ्या तिघाही भाजप नेत्यांची पक्षातून हकालपट्टी करावी, अशी मागणी निवडणूक प्रचारादरम्यान भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे करूनही प्रत्यक्ष कारवाई न झाल्याने महायुती समर्थक मतदारांमध्ये शेवटपर्यंत गोंधळाची परिस्थिती होती आणि त्यामुळेच महायुतीचे उमेदवार अभिजीत अडसूळ यांचा पराभव झाला, असे मत अरविंद नळकांडे यांनी व्यक्त केले आहे. अभिजीत अडसूळ यांच्या पराभवास नवनीत राणा, डॉ. अनिल बोंडे आणि प्रकाश भारसाकळे यांची संशयित भूमिका जबाबदार असल्याचे स्पष्ट पुरावे उपलब्ध असल्यामुळे या तिघांची पक्षातून तातडीने हकालपट्टी करुन योग्य संदेश द्यावा, अशी विनंतीही आपण चंद्रशेखर बावनकुळे यांना प्रत्यक्ष भेटून करणार असल्याची माहिती नळकांडे यांनी दिली

## रस्त्यावर उघड्यावर राहणारे बेघर निराधार लोकांसाठी शोध मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती –** अमरावती बडनेरा शहरातील सर्व प्रतिष्ठित नागरिकांना कळविण्यात येत आहे की शहरातील वाढत्या थंडीमुळे रस्त्यावर उघड्यावर राहणारे भिक्षेकरी, घर सोडून आलेले वृद्ध अपंग महिला पुरुष लहान मुले अशा प्रकारचे लोक जे रस्त्यावरच आपला उदरनिर्वाह करतात व रस्त्यावरच राहतात अशा सर्व लोकांसाठी अमरावती महानगरपालिका मार्फत आधार शहरी बेघर लोकांसाठी निवारा बडनेरा येथे थंडी पासून बचाव करण्यासाठी राहण्याची सुयोग्य व्यवस्था करण्यात आलेली आहे तरी आपणास विनंती आहे की आपणास अशा प्रकारचे गरजू लोक आढळल्यास आपण कृपया आमच्या संपर्क क्रमांक वर सूचना देऊन कळवावे ही नम्र विनंती. बडनेरा येथे महानगरपालिका मार्फत १०० लोकांची व्यवस्था होईल असे निवारा केंद्र उपलब्ध आहे.

## पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय येथे संविधान दिवस संपन्न

### २६/११ हल्ल्यातील शहिदांना अभिवादन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**
पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय येथे संविधान दिवस साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया व उप-प्राचार्य डॉ. मो. झुहेर यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून हार्रापण केले.

यानंतर भारतीय संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून उपस्थित सर्वांनी संविधानाची शपथ घेतली. तसेच दृश्य फीत दाखवून उपस्थित विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्व यावेळी प्राचार्यांनी सांगितले. सदर कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी २६/११ /२००८ मुंबई येथे झालेल्या दहशतवादि हल्ल्या मध्ये शहीद झालेल्या जवानांना व नागरिकांना दोन मिनिटे मौन पाळत अभिवादन करण्यात आले

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रीधर सुरेश मेंढे राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी यांनी केले. डॉ एस. नंदा, प्रा संदीप ठाकरे, प्रा जया तट्टे, प्रा जे सी बांबल, प्रा अक्षय धांडे ,प्रा प्रज्योत गंधक, प्रा. दुचक्के, प्रा पोल्हाड ,प्रा मयुरी पोहने, श्री साखे व श्री राजीव राजस यांनी मोलाचे सहकार्य करत कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न केला.

## जिल्ह्यातील २ हजार लाडक्या बहिणींचे अर्ज अद्यापही पडताळणीच्या प्रतीक्षेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती –** लाडकी बहीण योजनेअंतर्गत आतापर्यंत ७ लाख ३ हजार ४३६ लाडक्या बहिणींनी अर्ज दाखल केले होते. यामधून ६ लाख ८९ हजार ४९६ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. त्यांच्या खात्यात विधानसभा निवडणुकीपूर्वी पैसेही जमा झाले. मात्र, याशिवाय २ हजार ६७७ अर्ज पडताळणीमध्ये होते. त्यांना अद्यापही लाभ मिळाला नाही. या लाडक्या बहिणींचे अर्ज प्रलंबित आहेत.

जिल्ह्यात पहिल्या टप्यामध्ये नारीशक्ती ॲपवर ३ लाख ९८ हजार ३४१ महिलांनी




अर्ज केले होते. त्यानंतर अंगणवाडी सेविकांच्या पोर्टलवरून २ लाख ९१ हजार १५५ महिलांनी पुन्हा या योजनेकरिता नोंदणी केली. त्यामुळे आतापर्यंत ७ लाख ३ हजार ४३६ महिलांनी लाडकी बहीण योजनेकरिता अर्ज केले आहे. यापैकी आतापर्यंत ६ लाख ८९ हजार ४९६ महिलांचे अर्ज मंजूर करून त्यांना लाभ देण्यात आला. तसेच विविध कारणांनी ३ हजार २४२ महिलांचे अर्ज फेटाळण्यातआले होते. तर २ हजार ६७७ हजारांवर अर्ज पडताळणीमध्ये आहे. दरम्यान पहिल्या आणि दुसऱ्या टप्यातही महिलांच्या खात्यात पैसे जमा करण्यात आले. परंतु हजारोंच्या संख्येत महिलांच्या खात्याचे आधार सिडींग आहे. तरीही पैसे जमा न झाल्याने महिलांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

### संभ्रमातील लाडक्या बहिणींसाठी मदत केंद्रच नाही

महिलांना अर्जाबाबत तक्रारी करण्यासाठी महिला व बालविकास विभागात मदत केंद्र सुरू केले होते. परंतु ज्यांचे पैसे आले नाही. त्यांना मार्गदर्शन करण्याकरिता कोठेही मदत केंद्रच उपलब्ध नाही. आधार सिडींग आहे, अर्जही मंजूर आहे, तरी एकही हप्ता पोहोचला नाही, त्या महिलांना मार्गदर्शन करण्यासाठी कोठेही या विभागाकडून सुविधा उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्यामुळे त्यांनी कोठे जावे, कोणाला विचारावे, असा संभ्रम या महिलांमध्ये निर्माण झाला आहे.

## गुन्ह्यात मदतीसाठी २ हजारांची लाच घेणारा पीएसआय जाळ्यात

### जिल्हा परिषदेसमोर सापळा रचून एसीबीने रंगेहात पकडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**
शहरातील नागपुरी गेट पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात मदत करण्यासाठी एका तक्रारदाराकडून दोन हजारांची लाच घेणाऱ्या ग्रेड पीएसआयला एसीबीने रंगेहात पकडले आहे. ही कारवाई जिल्हा परिषदेसमोर मंगळवारी (दि. २६) एसीबीने केली आहे.

चंदन सोनाजी मोरे (५२) असे अटक केलेल्या श्रेणी पोलिस उपनिरीक्षकाचे नाव आहे. मोरे शहर पोलिस आयुक्तालयातील नागपुरी गेट ठाण्यात कार्यरत आहे. या प्रकरणातील ३७ वर्षीय तक्रारदाराविरुद्ध नागपुरी गेट ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यात तक्रारदार यांचे बाजूने तपास करून प्रतिबंधात्मक कारवाईमध्ये मदत करण्यासाठी तसेच सदर प्रकरणमिटवण्यासाठी श्रेणी पोलिस उपनिरीक्षक चंदन मोरे यांनी तक्रारदाराला १० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. या संदर्भात तक्रारदारांनी



२५ नोव्हेंबरला लाच लुचपत प्रतिबंधक विभागात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या अनुषंगाने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने केलेल्या पडताळणीत चंदन मोरे यांनी तडजोडीअंती २ हजार रुपयांच्या लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याची तयारी दर्शवल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार मंगळवारी सकाळी सापळा रचण्यात आला.यावेळी तक्रारदाराकडून २ हजार रुपयांची लाच स्वीकारताच चंदन मोरे यांना एसीबीच्या पथकाने अटक केली. त्यांच्याविरुद्ध गाडगेनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलिस निरीक्षक केतन मांजरे व पथकाने केली आहे.

## मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील जंगल सफारीला पर्यटकांचा प्रतिसाद

***विदर्भ प्रजासत्ताक***
***दि.२७ चिखलदरा***
विदर्भाच्या नंदनवन असलेल्या चिखलदरा पर्यटनस्थळा प्रमाणेच मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या विविध भागात सुरू असलेल्या जंगल सफारी, हत्ती सफारीसाठी पर्यटकांची गर्दी होऊ लागली आहे. मेळघाटात वाघ, बिबट, अस्वल, रानगव्याचे दर्शन पर्यटकांसाठी एक पर्वणी ठरले आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या वैराट, सेमाडोह, शहानूर, नरनाळा, बोरी, घारगड, वसाली, सिपना गुगामल व अकोट वन्यजीव विभागांतर्गत येणाऱ्या जंगल सफारीसह कोलकास येथील हत्ती सफारीला मोठ्या प्रमाणात पर्यटकांचा प्रतिसाद मिळू लागला आहे. त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगारउपलब्ध झाला आहे. दरम्यान अनेक कुटुंबांचे आखलेले बेत आता पर्यटनाने पूर्ण होऊ लागले आहेत. मेळघाटचा स्वर्ग म्हणून



ओळखल्या जाणाऱ्या कोलकास येथे व्याघ्र प्रकल्पाच्या वतीने २० ऑक्टोबरपासून हत्ती सफारी सुरू झाली आहे. पर्यटक मेळघाटकडे आकर्षिले जात आहेत. हत्ती सफारीसह मेळघाटातील चिखलदरा पर्यटन व विविध भागांना भेटी देत आहेत.

बच्चेकंपनीसाठी पर्वणी असलेली हत्ती सफारी खास आकर्षण ठरले आहे. चिखलदरा पर्यटनासह सेमाडोह येथे जंगल सफारीसाठी जिप्सी असून, मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या सिपना व गुगामल वन्यजीव विभागांतर्गत असलेल्या वैराट, सेमाडोह, कुवापाटी आदी जंगलात हीजंगल सफारी पर्यटकांना आकर्षणाचे केंद्र ठरली आहे. विविध वन्यप्राणी, पशु-पक्षी यांचे खास आकर्षण असले तरी मोठ्या प्रमाणात आता पर्यटकांना या प्राण्यांचे दर्शन होऊ लागले आहे. घनदाट अरण्यात होणारी जंगल सफारी सुरू झाली. सफारीसाठी चार हत्ती तैनात आहेत.

### मेळघाटच्या राजासह बिबटे, सांबराचे दर्शन

जंगल सफारीदरम्यान पर्यटकांना हमखास वाघ, बिबट, अस्वल, रानगवा, सांबर, हरिण, मोर तसेच विविध पक्षी-प्राण्यांचे दर्शन होत आहे. नरनाळा, शहानूर जंगल सफारी दरम्यान विविध प्राण्यांचे झालेले दर्शन पर्यटकांनी कथन केले. तसेच सेमाडोह जंगल सफारीतही विविध वन्य जिवांसह वाघाचे दर्शन पर्यटकांना होत असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी दिली.

आरएफओ पी. एस. तळखंडकर, वनपाल आर. डी. महल्ले, महावत आर. - झेड. दारसिंबे, एस. पी. मावसकर व वनमजूर त्यांच्या देखरेखीसाठी आहेत. दरम्यान, निसर्ग सौंदयनि मेळघाट बहरला - आहे. त्यामुळे पर्यटकांनी मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील जंगल सफारी नक्की करावी, असे मत. पर्यटक समीर वानखेडे यांनी व्यक्त केले.

# रवी राणांच्या प्रचारसभेत फडणवीसांचे ‘ते’ शब्द खरे ठरले

**विदर्भ प्रजततक**

**दि.२७अमरावती :** महायुतीतून युवा स्वाभिमान पार्टीचे बडनेराचे उमेदवार रवी राणा यांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ८ नोव्हेंबर रोजी येथील गोपालनगर टी पॉइंटवर प्रचार सभा घेतली होती. या सभेत फडणवीस यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या डोक्याचे नट रवी राणांच्या ’पाना’ने कसायचे आहेत, अशी बोचरी टीका केली होती. अखेर विधानसभा निवडणुकीचे निकाल आल्यानंतर फडणवीसांनी राज्यातून महाविकास आघाडी भुईसपाट करण्याची स्वप्नपूर्ती बघितली होती, ती पूर्ण झाली. म्हणून रवी राणांच्या प्रचार सभेतील फडणवीसांचे ’ते’ शब्द खरे ठरले, आता याविषयी जोरदार चर्चा रंगत आहे.

बडनेराचे आमदार रवी राणा हे भाजपचे मित्रपक्ष असून त्यांची विकासात्मक कामे फार मोठी आहेत. खरे तर त्यांना मतदारसंघात प्रचार करण्याची गरजच नाही. कारण त्यांचे निवडणूक चिन्ह ’पाना’ आहे, याच पान्याने येत्या काळात महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या डोक्याचे नट कसायचे आहेत, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले होते. भाजपच्या कोट्यातून बडनेराची जागा रवी राणा यांना देण्यात आली असून त्यांचे बोधचिन्ह पाना आहे. ते कोणाकोणाचे नट कसतील माहीत नाही. पण आम्हालादेखील विरोधकांच्या




डोक्याचे नट कसायचे आहेत, त्यासाठी तुमच्या पान्याची आवश्यकता पडेल, असा टोलाही देवेंद्र फडणवीस यांनी लगावला होता. अखेर विधानसभा निवडणुकीचे निकाल हाती येताच महायुतीने २३५ जागांवर विजय मिळवीत महाविकास आघाडीला ’जोर का धक्का धिरे से’ अशीच धोबीपछाड दिली आहे. बडनेराचे आमदार रवी राणा यांच्या प्रचार सभेत काढलेले शब्द खरे ठरल्याने ’ती’ सभा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी राजकीयदृष्ट्या ’लकी’ ठरली, यात दुमत नाही.

### रवी राणांचा विजयाचा चौकार अन् इतिहास नोंदविला

बडनेरा मतदारसंघात निवडणुकीच्या काळात आमदार रवी राणा यांच्या ’किराणाची धूम पाहावयास मिळाली. त्यातच लाडक्या बहिणींचे मतदान बोनस ठरले. रवी राणा हे राजकारणातील अजब रसायन असल्याचे त्यांनी सिद्ध केले आहे.

राणांनी आपला विजय हा भगव्या-निळ्या वादळाचा असल्याचे प्रसारमाध्यमांशी बोलताना स्पष्ट केले आहे. बडनेरा मतदारसंघात अपक्ष उमेदवार म्हणून राजकीय ताकद उभी करणारे एकमेव ते आमदार ठरले आहेत. त्यामुळे नव्या महायुती सरकारमध्ये रवी राणांना मंत्रिपदाची संधी हमखास मानली जात आहे.

# आग्रा-लखनौ एक्स्प्रेस-वेवर भीषण अपघात

## सैफई मेडिकल युनिव्हर्सिटीमधील ५ डॉक्टरांचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७आग्रा** - उत्तर प्रदेशमधील आग्रा-लखनौ एक्स्प्रेस-वेवर झालेल्या भीषण अपघातात सैफई मेडिकल युनिव्हर्सिटीमधील पाच डॉक्टरांचा मृत्यू झाला आहे. हे डॉक्टर लखनौ येथून आग्र्याकडे जात होते. त्यादरम्यान पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास ते प्रवास करत असलेली स्कॉर्पियो भरधाव वेगाने दुभाजकावर आदळली आणि हा भीषण अपघात झाला.याबाबत मिळालेल्या माहितीनुसार आग्रा-लखनौ एक्स्प्रेस वे वर कन्नौजजवळील तिर्वा येथे हा अपघात



झाला. पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास हे डॉक्टर प्रवास करत असलेली भरधाव स्कॉर्पियो दुभाजकावर आदळून दुसऱ्या लेनमध्ये गेली आणि समोरून येणाऱ्या ट्रकवर आदळली. त्यात पाच जणांचा मृत्यू झाला. तर एक जण गंभीर जखमी झाला. अपघातात मृत्युमुखी पडलेले सर्वजण सैफई मेडिकल युनिव्हर्सिटीमधील डॉक्टर असल्याचं समोर आलं आहे. तसेच हे सर्वजण लखनौमधील एका विवाह सोहळ्यात सहभागी होऊन सैफई येथे परतत होतो, अशीमाहिती समोर आली आहे. दरम्यान, तिर्वा मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर सी.पी. पाल यांनी सांगितले की, रुणालयात सहा जणांना आणण्यात आले. त्यापैकी पाच जणांचा मृत्यू झाला होता. तर एखजण गंभीर जखमी अवस्थेत होता. त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

# नवनियुक्त डॉ.अरविंद मोहरे (शिक्षणाधिकारी प्राथमिक जि.प.अमरावती)यांचे प्राथमिक शिक्षक समिती कडून स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती** - मंगळवार ला महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा अमरावती च्या वतीने जि.प.अमरावती चे प्राथमिक विभागाचे नवनियुक्त शिक्षणाधिकारी डॉ.अरविंदजी मोहरे यांची सदिच्छा भेट घेण्यात आली.त्यांचे स्वागत करण्यात आले. या भेटी दरम्यान साहेबांचे अभिनंदन करून,पुढील कार्यासाठी



अमरावती,.नितीन देशमुख सर तालुकाध्यक्ष अमरावती , मा. सत्यनारायणजी यादव सर मुख्याध्यापक पं.स.भातकुली व शैलेंद्र स.दहातोंडे जिल्हा सरचिटणीस उपस्थित होते.असे शुभेच्छा देण्यात आल्या.स्वागत करते वेळी अजयजी पवार जिल्हाध्यक्ष, संभाजी रेवाळे माजी जिल्हा सरचिटणीस तथा संचालक शिक्षक बँक, शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# ५१ वी ज्युनियर राज्य अजिक्य पद कबड्डी शिबीर कॅम्प चांदुर बाजार येथे आयोजन

## विदर्भ अँम्मुचर कबड्डी असोसिएशन ऑफ विदर्भ माध्यमातून खेळाडू ची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ चांदुर बाजार** - ५१ वी ज्युनियर राज्य अजिक्य पद कबड्डी स्पर्धा दि २९ नोंहेबर ते १ डिसेंबर मध्ये नांदगाव पेठे येथे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धा करिता विदर्भातील गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, नागपूर, वाशीम, अकोला, अमरावती, बुलडाणा, यवतमाळ, भागातील खेळाडू या स्पर्धेत दाखल होणार आहे या स्पर्धेकरिता प्रत्येक खेळाडू आपल्या कलेचे कौशल्य या




कबड्डी स्पर्धेत दाखवणार आहे या करिता विदर्भ अँम्मुचर कबड्डी असोसिएशन ऑफ विदर्भ अध्यक्ष जितेंद्र ठाकूर, व सहसचिव सहसचिव सतीश डफळे यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती जिल्ह्यातील खेळाडू चे शिबिर सुध्दा लावण्यात आले आहे अमरावती जिल्हा मुले कबड्डी स्पर्धा शिबिर कॅम्प चे आयोजित चांदुर बाजार येथिल क्रीडा मार्गदर्शक सुयोग गोरले व सनी चिखले यांच्या मार्गदर्शनाखाली गो सी टोम्पे महाविद्यालय चांदुर बाजार येथे देण्यात आले आहे या शिबिरात सूंदर मार्गदर्शन करून खेळाडू प्रशिक्षण दिले जात आहे या शिबीर कॅम्प ला भेट देण्यासाठी जीवन आधार संस्थेचे अध्यक्ष जीवनदादा जवंजाळ, भास्करराव टोम्पे अध्यक्ष गो सी टोम्पे , विजयराव टोम्पे सचिव गो सी टोम्पे, उपस्थिती दर्शवून खेळाडू ला मार्गदर्शन केले. विदर्भ अँम्मुचर कबड्डी असोसिएशन ऑफ विदर्भ चे अद्यक्ष श्री जितेंद्रजी ठाकूर यांच्या मार्गदर्शना खाली अमरावती जिल्हा शहर व अमरावती जिल्हा मुले मुली कबड्डी संघ निवडण्यात आला असून

ग्रामिण भागातील खेळाडू जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय दर्जापर्यंत जावे असे प्रयत्न जितेंद्र ठाकूर नेहमीच करित असतात.

# ५ वी पास - ६ आमदार पोहचले विधानसभेवर

# तर ६५ टक्के आमदारांवर गंभीर गुन्हे

**दि.२७मुंबई** - महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत निवडून आलेल्या २८८ पैकी २७७ (९७ %) आमदार करोडपती आहेत.



निवडून आलेल्या आमदारांची सरासरी संपत्ती ४३.४२ कोटी रुपये असल्याचे द असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) च्या अहवालातून समोर आले आहे. निवडून आलेल्या १८७ (६५ %) आमदारांवर फौजदारी गुन्हे दाखल असून, ११८ आमदारांवर गंभीर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. हे प्रमाण ४१ टक्के आहे. २०१९ मध्ये २८५ पैकी १७६ आमदारांनी आपल्यावरील फौजदारी गुन्हे जाहीर केले होते तर २०१९ मध्ये २८५ पैकी ११३ आमदारांनी (४०%) आपल्यावरील गंभीर फौजदारी गुन्हे जाहीर केले होते.

**पक्षनिहाय करोडपती**

अजित पवार गट - ४१ आमदार (१०० टक्के)
समाजवादी पक्ष - २ आमदार (१०० टक्के)
जनसुराज्य शक्ती - २ आमदार (१०० टक्के)
शिंदेसेना - ५६ आमदार (९८ टक्के)
भाजपा - १२९ आमदार (९८ टक्के)
उद्धवसेना - १९ आमदार (९५ टक्के)
काँग्रेस - १५ आमदार (९४ टक्के)
शरद पवार गट - ७ आमदार (८८ टक्के)

**सर्वाधिक संपत्ती असलेले श्रीमंत आमदार**

३३८३ कोटी - पराग शाह, भाजपा
४७५ कोटी - प्रशांत ठाकूर, भाजपा
४४७ कोटी - मंगलप्रभात लोढा, भाजपा

सर्वात कमी संपत्ती असलेले आमदार

९ लाख - साजिद खान, काँग्रेस
३१ लाख - श्याम खोडे, भाजपा
६५ लाख - गोपीचंद पडळकर, भाजपा

**कसे वाढले करोडपती?**

२००९ - १८६ आमदार
२०१४ - २५३ आमदार
२०१९ - २६४ आमदार
२०२४ - २७७ आमदार

यंदाच्या विधानसभेत १६३ आमदारांकडे १० कोटीहून अधिक संपत्ती आहे. ५ ते १० कोटी संपत्ती असणाऱ्यांमध्ये ६३ आमदारांचा समावेश आहे. १ ते ५ कोटी संपत्ती असलेल्या आमदारांची संख्या ५१ इतकी आहे. २० लाख ते १ कोटी संपत्ती असणाऱ्यांची संख्या ८ आहे. तर २० लाखांहून कमी संपत्ती असलेले एकमेव आमदार आहेत.

**गंभीर गुन्हे**

११ आमदारांवर खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हे दाखल आहेत

१० आमदारांवर महिलांवरील अत्याचारसंबंधित गुन्हे घोषित केलेत.

**शिक्षित आमदार किती?**

साक्षर - २
५ वी पास - ६
८ वी पास - २०
१० वी पास - ३१
१२ वी पास - ४८
पदवीधर - ६५
पदवीधर व्यावसायिक - ५४
पदव्युत्तर - ३९
डॉक्टरेट - ७
डिप्लोमा - १४

# मोर्शी मतदारसंघातील सर्वच केंद्रांवर भाजपला मताधिक्य

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७मोर्शी** नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे उमेश उर्फ चंदू यावलकर यांनी जोरदार विजय मिळवला असून, जवळपास सर्वच मतदार केंद्रांवर त्यांना प्रतिस्पर्धी उमेदवारापेक्षा अधिक मते मिळाली आहेत. एकट्या मोर्शी शहरात त्यांनी ११ हजार ३५५ मते मिळवली.

मोर्शी तालुक्यात मनीमपूर या गावासह ३० केंद्रावर मतदान पार पडले. यामध्ये २० हजार ७८८ मतदारांनी मतदान केले. तालुक्यांतील बहुतेक केंद्रांसह मोर्शी शहरातील सर्व केंद्रावर चंदू यावलकर यांना इतरांच्या तुलनेत अधिक मते मिळाली आहेत. त्याखालोखाल राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार गिरीश कराळे यांना ३ हजार ७५७ तर अपक्ष उमेदवार विक्रम ठाकरे यांना २ हजार ४३७ मते मिळाली. मावळते आमदार देवेंद्र भुयार यांना फक्त १ हजार ९५५ मते मिळाली. मोर्शीचेउमेदवार विपुल भडांगे यांना मोर्शी शहरातून फक्त २५३ मते मिळाली. याउलट यावलकर यांना मोर्शी शहरातील ८ मतदान केंद्रावर






५०० च्या वर मते मिळाली. उर्वरित उमेदवारांना मोर्शी शहरातून एकाही मतदान केंद्रावर पाचशेचा आकडा गाठता आला नाही. मनीमपूर वगळता शहरातील सर्वच केंद्रावर यावलकर यांना शंभरच्या वर मते मिळाली तर कराळे यांना १५ केंद्रावर, विक्रम ठाकरे यांना ९ केंद्रावर व देवेंद्र भुयार यांना मोर्शी शहरातील फक्त ३ मतदान केंद्रावर शंभरी गाठता आली. मेरे शहरात ३२ हजार ८३२ मतदार असून यापैकी २० हजार ७८८ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता. यापैकी भाजपचे चंदू यावलकर यांना ११ हजार ३५५ मते मिळाली. संपूर्ण मतदार संघात ’नोटा’ हा पर्याय निवडणारेही काही आहेत. निवडणूक यंत्रणेने त्यांची मोजदाद केली असून ती ७४९ एवढी आहे. दुसरीकडे नऊ उमेदवारांना हजार मतांचासुद्धा आकडा गाठता आला नाही.

# आजी-माजी खासदारांच्या सगे-सोयऱ्यांना दे धक्का; ‘कहीं खुशी, कहीं गम’

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती :** यंदा राज्यात विधानसभा निवडणुकीत घराणेशाहीचा वरचष्मा दिसून आला. आमदारांनी त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना, तर काही आजी-माजी खासदारांनी सगे-सोयऱ्यांना निवडणुकीच्या मैदानात उतरविले होते. यामध्ये ‘कहीं खुशी, कहीं गम’ असा निकाल असल्याचे चित्र पुढे आले. राज्यात १९ आजी-माजी खासदारांच्या जवळचे नातेवाईक रिंगणात होते. यात पराभूत होणाऱ्यांची संख्या मात्र कमी आहे.

काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी त्यांच्या भगिनी ज्योती गायकवाड यांना धारावीतून रिंगणात उभे केले होते. त्या विजयी झाल्यात. उद्धवसेनेचे नेते तथा खासदार संजय राऊत यांनी त्यांचे बंधू सुनील राऊत यांना विक्रोळीतून उभे केले होते, ते येथे विजयी झालेत. अजित पवार राष्ट्रवादीचे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांची कन्या अदिती तटकरे यांना श्रीवर्धन मतदारसंघातून उमेदवारी दिली होती, येथे अदिती निवडून आल्या आहेत. खासदार सुनेत्रा पवार यांचे पती अजित पवार हे बारामतीतून विजयी झालेत. धनंजय महाडिक यांचे नातेवाईक अमल महाडिक हे दक्षिण कोल्हापूर मतदारसंघातून विजयी झाले. माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे सुपुत्र नितेश राणे हे कणकवली आणि नीलेश राणे



कुडाळमधून विजयी झालेत. शरद पवार राष्ट्रवादी काँग्रसचे रोहित पवार हे शरद पवार यांचे नातू कर्जत-जामखेड मतदारसंघातून दुसऱ्यांदा विजयी झाले. संभाजीनगरचे खासदार संदीपान भुमरे यांचा मुलगा विलास भुमरे यांनी पैठणमधून बाजी मारली. माजी खासदार रावसाहेब दानवे यांचे चिरंजीव संतोष दानवे हे भोकरदन आणि कन्या संजना जाधव या कन्नड मतदारसंघातून विजयी झाल्यात. माजी खासदार सुजय विखे-पाटील यांचे वडील राधाकृष्ण विखे-पाटील हे शिर्डीतून विजयी झालेत. तर खासदार नीलेश लंके यांच्या पत्नीला पारनेरमधून पराभवाचा सामना करावा लागला.

खासदार सुप्रिया सुळे यांचे चुलतबंधू युगेंद्र पवार हे बारामतीतून पराभूत झाले. माजी खासदार प्रीतम मुंडे यांचे चुलतबंधू धनंजय मुंडे हे परळीतून विजयी झाले. रवींद्र वायकर यांच्या पत्नी पूर्व जोगेश्वरीमधून पराभूत झाल्यात.

### वर्धा, चंद्रपूरच्या खासदारांना ‘दे धक्का’

अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांचे यजमान रवी राणा यांनी बडनेरातून चौकार लगावला. माजी खासदार दत्ता मेघे यांचे सुपुत्र समीर मेघे हिंगणामधून विजयी झाले. माजी खासदार आनंदराव अडसूळ यांचे सुपुत्र कॅप्टन अभिजित अडसूळ हे दर्यापुरात पराभूत झाले. वर्धाचे खासदार अमर काळे यांच्या पत्नी मयूरा काळे या आर्वीतून, तर चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांचे बंधू प्रवीण काकडे हे वरोरामधून पराभूत झाले. या निकालानंतर विदर्भात घराणेशाहीला काहीसा विरोध झाला, हे दर्शविते.

केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांची नणंद रोहिणी खडसे या मुक्ताईनगर येथून पराभूत झाल्यात.

# एकट्या महिलेला हेरुन चाकुचा धाक दाखवुन मंगळसूत्र चोरी करणाऱ्या टोळीला अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची दबंग कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

अमरावती ग्रामीण व शहरामध्ये एकटया महिलेला हेरुन चाकुचा धाक दाखवुन लुटून जबरी चोरी करणाऱ्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेकडुन अटक करण्यात आली असून त्यांच्या कडून चोरीचा मुद्देमाल हि जप्त करण्यात आला असल्याची माहिती ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आंनद यांनी आज पत्रकार परिषदेदरम्यान बोलतांना दिली.

गेल्या काही दिवसांपासून अमरावती शहर व ग्रामीण भागात एकटया बाईला हेरुन चाकुचा धाक दाखवुन लुटून जबरी चोरी करण्याच्या घटनेत मोठी वाढ झाली होती.या संबंधातील अनेक तक्रारी सुद्धा पोलिसांकडे प्राप्त झाला होत्या त्या अनुषंगाने ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शानुसार स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामिण येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन करून कारवाई करण्याबाबत सुचना निर्गमीत केल्या होत्या.



त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री. किरण वानखडे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण येथील चांदुर रेल्वे उपविभागातील पो.उप.नि. मो. तस्लीम व मोर्शी उपविभागातील पो.उप.नि. सागर हटवार यांचे पथक जबरी चोरीच्या घटनेचे ठिकाण व वेळ तसेच फि' नी तक्रारीत नमुद केलेले आरोपीचे वर्णनाचा सखोल अभ्यास करुन रेकॉर्डवरील, जेलमधुन सुटून आलेल्या गुन्हेगारांवार पाळत ठेवून आपआपले बातमीदारांमार्फत गुन्हेगारांची माहिती घेवून गुन्हयांचा समांतर तपास करीत असतांना पथकाला गोपनिय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सदरचे गुन्हे हे मोहम्मद शाहरुख मोहम्मद रफीक रा. अडगाव (खा.) ता. अंजनगाव सुर्जी, हा त्याचे साथीदारासह करत असुन तो मुस्कान नगर, अमरावती येथे त्याचे कुटूंबासह मागील ७-८ वर्षापासुन भाडयाने राहत आहे. अशा माहितीवरुन पथकाने मुस्कान नगर मध्ये गोपनिय बातमीदार नेमुन नमुद आरोपीबाबत इंत्यभुत माहिती प्राप्त केली असता नमुद आरोपी हा मागील काही दिवसांपासुन वेगवेगळ्या मित्रांसोबत वावरुन ऐपत नसतांना खर्च करीत असल्याची माहिती मिळाली. सतत ३ दिवस आरोपीवर पाळत ठेवून अमरावती शहरातील ट्रान्सपोर्ट नगर मधील टॉवर लाईन परिसरातुन १) मो. शाहरुख मो. रफीक वय २२ वर्ष, रा. अडगाव खाडे, ता. अंजनगाव सु. ह.मु. मुस्कान नगर, अमरावती २) मो. शोएब मो. सलीम वय २३ वर्ष, रा. मुस्कान नगर, अमरावती ३) सैय्यद मोहसीन सेय्यद हसन वय २७ वर्ष, रा. पठाण चौक, अमरावती ४) जावेद खान जाकीर खान वय २३ वर्ष, रा. अलकरीम नगर नं. २. अमरावती यांना ताब्यात घेण्यात आले.

ताब्यात असलेल्या १) मो. शाहरुख मो. सलीम रा. अमरावती यास गुन्हयासंबंधाने विश्वासात घेवून विचारपुस केली असता सुरूवातीला नमुद आरोपी उडवा-उडवीची उत्तरे देवू लागला. त्यास विश्वासात घेवून विचारपुस केली असता आरोपीने अमरावती ग्रामीण घटकातील १) पो.स्टे. तळेगाव दशासर हद्दीतील ग्राम बग्गी, चांदुर रेल्वे हवीतील ग्राम लालखेड, ग्राम पळसखेड, मांजरखेड व अमरावती शहर हद्दीतील वलगाव हद्दीतील ग्राम विशी, देवरी निपानी येथे घडलेल्या सर्व घटनां मो. शोएब मो. सलीम से. मोहसीन से. हसन जावेद खान जाकीर खान सर्व रा. अमरावती या साथीदारांसह केल्याची कबुली देवून मो. शाहरुख हा कर्जबाजारी असल्याने व त्याचे साथीदारांना खर्याला पैशाची उणीव भासत असल्याने त्यांनी मिळून ग्रामीण भागात आळीपाळीने वेगवेगळया मोटर सायकलवर जावून शेतातून किंवा रोडने एकटया जाणाऱ्या येणाऱ्या महिलांवर पाळत ठेवून बाईला चाकुचा धाक दाखवून जबरीने त्यांचे गळयातील सोन्याचे दागीने तोडून पळून जात असल्याचे सांगीतले.आरोपी कडून जबरी चोरीचे पुढीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आले असून सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. पंकज कुमावत सा., अमरावती ग्रामीण, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा श्री. किरण वानखडे यांचे मार्गदर्शनात पो.उप.नि. मोहम्मद तस्लीम, पो.उप.नि. सागर हटवार, पो.उप.नि. नितीन इंगोले, श्रेणी पोउपनि मूलचंद भांबुरकर, पोलीस अंमलदार अमोल देशमुख, मंगेश लकडे, चंद्रशेखर खंडारे, सचिन मसरांगे, बळवंत दाभणे, गजेंद्र ठाकरे, रवि बावणे, भूषण पेठे, पंकज फाटे, से. अजमत, सुनिल महात्मे, सुधीर बावने, निलेश डांगोरे, सचिन मिश्रा, शकिल चव्हान व पोलीस स्टेशन सायबर चे सागर धापड, रितेश वानखडे, चेतन गुल्हाने, गुणवंत शिरसाठ चालक अंमलदार संजय प्रधान, हर्षद घुसे, प्रशांत राजस, आदेश गुंजरकर यांनी केली.

# पांढरे सोने शेतातच : उत्पादकांचा जीव टांगणीला, वेचणीचे दरही वाढले

## निवडणूक झाली, निकाल लागला, तरीही मजूर भेटेनात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ मोर्शी**

मोर्शी तालुक्यातील शेतकरीखरीप हंगामात कापूस पिकाची लागवड करीत असतात. सध्या कापूस वेचणीला आलेला आहे; पण मजुरांअभावी वेचणी रखडली आहे. निवडणूक झाली, निकालही लागला; पण मजूर गेले कुठे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.



नगदी पीक म्हणून शेतकरी मोठ्या प्रमाणात कापूस पिकाची लागवड करतात. मात्र, कापूस वेचणी करणारे मजूर वेळेवर मिळत नाहीत. कापूस वेचणीला मजुरांची कमतरता जाणवू लागल्याने लाखमोलाचे पांढरे सोने शेतातच आहे. त्यामुळे मजूर मिळत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. मात्र, काबाडकष्ट करून पिकविलेला कापूस वेचून घरी आणता यावा, यासाठी शेतकऱ्यांची धडपड सध्या सुरू आहे.

**किडीचाही प्रादुर्भाव**

वातावरणात मोठ्या प्रमाणात बदल होत असल्याने पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. पावसाअभावी यंदा कापूस करपला तर लाल्या रोगाने कापूस पिकाला नष्ट केले आहे.त्यामुळे उत्पादक शेतकऱ्यांना फवारणीसाठी जादा पैसे खर्च करावे लागले.

### शासकीय खरेदी केंद्र नसल्याने लूट

यंदा खासगी बाजारपेठेत ६ ते ७ हजार रुपये दराने कापसाची खरेदी करण्यात येत आहे. हा दर शेतकऱ्यांना परवडणारा नाही. पांढरे सोने अजूनही शेतातच असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. तथापि, तालुक्यासह जिल्ह्यात एकही खरेदी केंद्र नाही. त्यामुळे उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या मेहनतीने पिकवलेला माल खासगी व्यापाऱ्यांना कवडीमोल दराने विकावा लागत आहे. यामुळे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

### सोयाबीनने दगा दिल्याने कापसावर भिस्त

यंदा कापसाच्या उत्पादनात कमालीची घट होण्याची शक्यता आहे. त्यातच सोयाबीनचे दर वाढलेच नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांची भिस्त कापूस पिकावर अवलंबून आहे. मात्र, यंदाचे वातावरण पाहता कापूस पिकावर केलेला खर्चही भरून निघेल की नाही, अशी चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

# परवानगी घ्या, कारवाई टाळा : लग्नात डीजे वाजवाल तर होणार कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

तुळशी विवाहआटोपल्यानंतर आता लग्नाची धूम सुरू झाली आहे. मात्र, अलीकडे मिरवणूक, लग्नाच्या वरातीत तसेच रिसेप्शनमध्ये डीजे वाजविण्याची अणू प्रथाय सुरू झाली आहे. परंतु आता लग्नात विनापरवानगी डीजे वाजविल्यास पोलिस कारवाईची शज्यता आहे. त्यामुळे लग्नात डीजे वाजविण्याचा विचार करणान्यांनी परवानगी घेतली नाही तर चांगलेच महागात पडू शकते. प्रसंगी पोलिसकारवाईला सामोरे जावे लागू शकते लग्न असो अन्य वा कार्यक्रम, डीजे वाजविण्याची परवानगी घेणे बंधनकारक आहे. ज्या परिसरात लग्न आहे, तेवील पोलिस ठाण्यात जाऊन लग्नात डीजे वाजविण्यास परवानगी काढावी लागते. मात्र, अनेक जण परवानगी घेण्याच्या भानगडीत पडत नाही. त्यामुळे ते अडचणीत येण्याची शक्यता आहे. परवानगी न घेताच डीजे वाजविल्यास संबंधितांवर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होऊ शकतो.

**...तर होणार डीजेंवर कारवाई**

राज्यात विविध सण, उत्सव, लग्न व रिसेप्शनमध्ये तसेच मिरवणुकांमध्ये शहरात



परवानगी न घेता डीजे वाजविल्याप्रकरणी अनेकांवर कारवाई करण्यात आली आहे. संबंधितांवर गुन्हेही दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे परवानगी घेणे गरजेचे आहे. परंतु, अनेकदा परवानगी न घेता डीजे वाजविण्याचे प्रकार दिसून येतात.


**५५ डेसिबलपेक्षा अधिक आवाज नको**

नागरिकांनी नियमांचे उल्लंघन करू नये तसेच इतराना कोणताही वास होईल, असा प्रकार करू नये. कुठल्याही सण, उत्सव व कार्यक्रमात ५५ डेसिबलपेक्षा अधिक आवाजाने वाद्य वाजविल्यास कारवाई करण्यात येते.

# थंडी वाढली, श्वसन विकारांचा सीझन आला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

प्रत्येक गोष्टीचा एक हंगाम असतो, त्या काळात त्या विशिष्ट गोष्टी पाहायला मिळतात. मानवी आरोग्याच्या बाबतीतही तसेच आहे. नोव्हेंबर आणि डिसेंबर म्हटले की, या काळात श्वसनविकारांच्या व्याधीचे रुग्ण मोठ्या प्रमाणात दिसून येतात. अनेकांना गुलाबी थंडी आवडत असली तरी येताना ती सोबत काही आजारही घेऊन येते, असे म्हणायला हरकत नाही. या दिवसांमध्ये घरटी सर्दी, खोकल्याचा रुग्ण आढळून येतो. थोड्या दिवसात बरा होणारा हा



आजार असला तरी त्या आजाराच्या तीन-चार दिवसांच्या काळात नागरिक आणि लहाने मुले हैराण होऊन जातात.

पावसाळा आणि उन्हाळा अनेकांना त्रासदायक वाटतो. त्यामुळे कधी ती एकदाची थंडी पडतेय याची वाट पाहत असतात. मात्र, काही नागरिकांना विशेषकरून श्वसनविकाराच्या व्याधीला सामोरे जावे लागते. काही ज्येष्ठ नागरिकांना न्यूमोनियासारखा आजारही बळावते. काहींचा विकार इतका बळावतो की, त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागते.

प्रदूषित हवा श्वसनावाटे फुफ्फुसात गेली की नागरिकांना सुरुवातीच्या काळात खोकल्याचा त्रास जाणवायला लागतो. हा त्रास काही दिवस राहिल्यास खोकलुन खोकलुन घसा लाल होतो. त्यामुळे या आजारावरील उपचाराकरिता डॉक्टरकडे जावे लागते. काही प्रमाणात याचा त्रास अधिक जाणवून ताप येतो.

### काळजी घ्या, सूर्यप्रकाशात बाहेर पडा

नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात थंडी पडत असल्याने या महिन्यांमध्ये श्वसनविकाराशी संबंधित रुग्णांमध्ये वाढ होते. त्यातच प्रदूषणामुळे श्वसनमार्गात संसर्ग होतो. सध्या ताप, खोकला, दमा, अस्थमा, ॲलर्जी आणि न्यूमोनिया आदी व्याधी रुग्णांमध्ये दिसून येतात. या काळात विशेष काळजी घेतली पाहिजे. वातावरणात धुके आणि धुळीचे साम्राज्य असल्यास नागरिकांनी अगदी पहाटे फिरायला न जाता सूर्यप्रकाश निघाल्यावर जाणे सोयीचे असते.

**डॉ.स्वप्नील दुधाट ,अमरावती**

# प्रशासन होते निवडणुकीत व्यस्त, रेतीतस्कर मस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७धामणगाव रेल्वे**

महसूल विभाग निवडणुकीच्या कामात व्यस्त असल्याचा फायदा घेत तस्करांनी मोठ्या प्रमाणात रेतीउपसा केल्याची माहिती आहे. काही जणांनी रेतीचा साठा केला असून अधिकायांच्या व्यस्ततेचा फायदा घेत माफियांनी रेतीची लयलूट केल्याच्या तक्रारी आहेत

शहरातील बांधकामाकरिता लागणारी रेती प्रामुख्याने वर्धा नदीच्या पात्रातून काढली आहे. मात्र मागील ५ वर्षांपासून या पात्रातून पर्यावरणाच्या कारणास्तव रेती उपशावर बंदी आहे. त्यामुळे बांधकाम व्यावसायिकांना तस्करांकडून रेती खरेदी करावी लागत आहे. मात्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रशासन कामात व्यस्त होता. या संधीचा फायदा घेत रेती तस्वम्रांनी मोठ्या प्रमाणात उपसा केला, ती उत्खनन बंदीपूर्वी सहाशे ते आठशे रुपये ट्रैक्टर रेती मिळत होती. मात्र, हल्ली सर्वसामान्यांना ३ ते ४ हजार रुपये खर्च करून रेती खरेदी करावी लागत आहे. रेतीला कोणताही पर्याय नसल्यामुळे नाइलाजास्तव बांधकाम करणारे रेती खरेदी करीत आहेत. नवीन सरकारने उत्खननावरील बंदी हटवून रेतीला सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणण्याच्या मागणीने पाडला आहे.

# कर्तव्याच्या जाणिवेतून दिव्यांगाना मिळाले साहित्य

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे हस्ते ५० दिव्यांगाना किट वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

कधीकाळी सर्व शिक्षा अभियान तिवसा अंतर्गत दिव्यांगासाठी प्रशांत मेश्राम हे सायकोलॉजिस्ट म्हणून कार्य करायचे. आज छत्तीसगड येथे कार्यरत असताना त्यांच्या पुढाकाराने अमरावती जिल्ह्यातील एस टी प्रवर्गातील बौद्धिक अक्षम व स्वमग्न प्रवर्गातील एकूण ५० विद्यार्थ्यांना निशुल्क शैक्षणिक साहित्य प्राप्त झाले. दि. २६ नोहेंबर रोजी संविधान दिनाच्या पर्वावर मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र व शिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनोने यांचे हस्ते समग्र शिक्षा जिल्हा कार्यालय अमरावती येथे वितरण करण्यात आले.



राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्थान सिकंदराबाद ही संस्था राष्ट्रीय स्तरावरील बौद्धिक दिव्यांग विद्यार्थ्यासाठी कार्य करते. याच संस्थेअंतर्गत राजनांदगाव (छत्तीसगड) कार्यालय येथे प्रशांत मेश्राम सध्या कार्यरत आहे. आपल्या जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबातील दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळावे म्हणून त्यांनी सहायक कार्यक्रम अधिकारी संगीता सोनोने यांचेशी संपर्क साधून विद्यार्थ्यांचे कागदपत्र संकलित करून ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण केली. या कार्यात जिल्हा समन्वयक वैशाली शिरभाते, स्वाती अंजीकर, कांचन दुधे, डॉ. प्रवीण राऊत यांनी मोलाची भूमिका बजावली.

राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्थान सिकंदराबाद संस्थेद्वारे ५० पात्र लाभार्थीना निःशुल्क किट चे वितरण समग्र शिक्षा जिल्हा कार्यालय येथे आयोजित करण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी संजीतामहापात्र यांचे हस्ते जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांना निशुल्क शैक्षणिक साहित्य (टी.एल.एम .किट) वितरित करण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनोने, सहायक कार्यक्रम अधिकारी संगीता सोनवणे राजनांदगाव येथील समावेशित तज्ञ पुनीत साहू , जिल्हा समन्वयक वैशाली शिरभाते, स्वाती अंजीकर, कांचन दुधे, डॉ. प्रवीण राऊत आदींसह १४ तालुक्यातील समावेशीत तज्ज्ञ उपस्थित होते. संविधान प्रास्तविकाचे वाचन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**दिव्यांगाना आत्मनिर्भर करुया – CEO महापात्र**

कुटुंबात दिव्यांग मुलं जन्मल्यावर अनेकजण नशिबाला दोष देत पालनपोषणात चालढकल करतात. आपण थोडे मुलांकडे लक्ष दिल्यास त्याला विविध शैक्षणिक साहित्य द्वारे शिक्षण पूर्ण केल्यास त्याला आत्मनिर्भर बनवू शकतो असे मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी उपस्थित पालकांना मार्गदर्शन करतांना म्हणाल्या.

# 'सुटलो बुवा एकदाचे'; पोलिसांनी सोडला सुटकेचा निःश्वास


## महिनाभरापासून होता बंदोबस्ताचा ताण : आता गुन्हे तपासकामाला वेग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

शनिवारी सायंकाळी मतमोजणी संपताच 'सुटलो बुवा एकदाचे' असेच शब्द अनेक पोलिसांच्या ओठावर आले. बुधवारचा मतदानाचा दिवस अन् शनिवारचा मतमोजणीचा दिवस मावळला तसा पोलिसांवरील ताणही निवळला. अमरावती पोलिस आयुक्तनविनचंद्र रेड्डी आणी ग्रामीण पोलीस अधिक्ष विशाल आंनद यांच्या नेतृत्वात सुनियोजित पद्धतीने आखलेल्या बंदोबस्तामुळे मतदान प्रक्रिया व मतमोजणी प्रक्रिया सुरळीत पार पडली. त्यानंतर पोलिसांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर १५ ऑक्टोबरपासून आचारसंहिता लागू झाली होती.जिल्ह्यातील सर्व च मतदान केंद्रांवर मतदानप्रक्रिया झाली. यंदा सर्वच मतदारसंघात दुरंगी, तिरंगी तर कुठे चौरंगी लढत झाल्यामुळे पोलिसांवरील ताणदेखील वाढला होता.







दैनंदिन कामासोबतच निवडणुकीचे काम करणे आव्हानात्मक असले तरी पोलिस दलाने हे आव्हान यशस्वी पेलले. बुधवार, २० रोजी निवडणुकीची महत्त्वाची मतदान प्रक्रिया राबवण्यातआली. यावेळी स्थानिक व बाहेरील असा मिळून पाच हजारांवर बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यासोबतच केंद्रीय निमलष्करी दल (सीएपीएफ) च्या चार कंपन्या, राज्य राखीव पोलिस दल (एसआरपीएफ) च्या दोन कंपन्या, दोन प्लाटून वहोमगार्डचाही समावेश होता. शनिवारी मतमोजणी झाली. सर्व विजयी उमेदवारांच्या विजयी रॅल्या निघाल्या. पोलिस अधिकारी व कर्मचारी रात्री १२ वाजेच्या सुमारास घरी पोहोचले अन् 'सुटलो बुवा एकदाचे' असे शब्द आपसूकच पोलिसांच्या ओठी आले.

### दिवाळीही करता आली नव्हती साजरी

ऐन दिवाळीच्या तोंडावर आचारसंहिता सुरू झाली. तेव्हापासूनच अर्ज भरण्यासाठी काढण्यात आलेल्या रॅल्या, प्रचारासाठी मोठ्या नेत्यांच्या सभा, प्रचार रॅल्या, रोड शो आदींमध्ये त्यांचा बंदोबस्त होता. त्यातही सर्व सुट्या रद्द करण्यात आल्या असल्याने पोलिसांना दिवाळीसुद्धा साजरी करता आली नव्हती. सततच्या बंदोबस्तामुळे पोलिसांना इतर गुन्हे शोधकामात वेळ मिळाला नव्हता. मात्र, आता तपास-कामाला गती देता येणार आहे.

# २३ डिसेंबरची डेडलाइन : खर्चात तफावत आढळल्यास बजावणार नोटीस

## प्रचार खर्चाची देयके जुळविताना उमेदवारांची कसरत

अरुण जोशी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७ अमरावती

विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या उमेदवारांनी धडाक्यात प्रचार केला. २३ नोव्हेंबरला निकालही लागला. आता निवडणूक आयोगाकडे २३ डिसेंबर २०२४ च्या आत खर्चाची देयके सादर करण्यासाठी उमेदवारांकडून जुळवाजुळव सुरू झाली. निवडणूक आयोगाचे सॅडो रजिस्टर व उमेदवारांनी दाखविलेल्या खर्चात एकसमानता नसेल तर नोटीस बजावण्यात येणार आहे.



अमरावती जिल्ह्यातील मेळघाट, अचलपूर, मोर्शी, तिवसा, धामणगाव रेल्वे, बडनेरा, दर्यापूर आणि अमरावती या आठ विधानसभा मतदारसंघात १६० उमेदवारांनी निवडणूक लढविली. उमेदवारांच्या प्रचाराचा खर्च तपासण्यासाठी निवडणूक आयोगाने विधानसभानिहाय खर्च निरीक्षकांची नियुक्ती केली होती. प्रचाराच्या काळातच खर्च सादर करण्याचे वेळापत्रक जाहीर केले. प्रत्यक्ष उमेदवार किंवा त्यांचा प्रतिनिधी खर्चाचा हिशेब समितीकडे सादर करण्याची मुभा होती. प्रत्येक निवडणुकीला उमेदवाराच्या खर्चाची मर्यादा वेगवेगळी असते. विधानसभा निवडणुकीसाठी २०१९ मध्ये २८ लाख होती.

२०२४ च्या निवडणुकीत १२ लाखांची वाढ करून ती ४० लाखांपर्यंत करण्यात आली. खर्चाच्या देयकांची इत्थंभूत माहिती सादर करण्याची अंतिम मुदत २२ डिसेंबर २०२४ पर्यंत आहे. निकाल लागून चार दिवस झाले. प्रचाराचा थकवा व मानसिक तणाव दूर होताच काही अपक्ष उमेदवारांनी खर्चाच्या देयकांची जुळवाजुळवही सुरू केली आहे.

### खर्चाचा ताळमेळच जुळेना

प्रचार म्हटले की, कार्यकर्त्यांसाठी भोजन, नाश्ता, वाहने आली. प्रचारासाठी उमेदवार आणि कार्यकर्त्यासाठी वापरण्यात आलेली वाहने, उमेदवारांचे आणि पक्षांचे बॅनर आदींवर तसेच सभा, बैठका व रॅली आदींसाठी लागणारे मंडप, खुर्ची, वाहने आदींवर मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो. या सर्व खर्चाचे हिशेब उमेदवार आणि कार्यकर्त्यांना सादर करावे लागणार आहेत. सादर केलेला खर्चदेखील निवडणूक विभागाने प्रसिद्ध केलेल्या दरानुसार ग्राह्य धरला जाणार आहे. त्यामुळे काही उमेदवारांना खर्चाचा ताळमेळ जोडताना नवनवीन देयके घ्यावी लागत आहेत.

### अर्ज भरताच सुरू झाले होते खर्चाचे मीटर

विधानसभेसाठी उमेदवारी अर्ज भरताच उमेदवारांच्या खर्चाचे मीटर सुरू झाले होते. मतदानापूर्वी प्रचारासाठी झालेला दैनंदिन खर्च निवडणूक विभागाच्या खर्च नियंत्रण समितीला सादर करावा लागतो. त्याचे तीन टप्पे ठरवून दिले होते. मात्र, किती उमेदवारांनी मतदानापूर्वीचा खर्च सादर केला, हे प्रशासनाने उघड केले नाही. खर्च नियंत्रण समितीने राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत प्रचार साहित्यांचे दर निश्चित केले. हे विशेष.


# अभ्यासक्रम लवकर आटोपण्याकडे शिक्षकांचा भर

## विद्यार्थ्यांनाही लागले परीक्षेचे वेध: १० दिवस आधी होणार १०-१२ वीच्या परीक्षा

विदर्भ प्रजासत्ताक दि.२७अमरावती

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर झाले आहे. बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत, तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत होत आहे. दोन्ही परीक्षा नियोजित तारखांच्या दहा दिवस अगोदर होणार आहेत. त्यामुळे अभ्यासक्रम लवकर आटोपण्याकडे शिक्षकांचा भर आहे. दहा दिवसाअगोदर परीक्षा होणार असल्यामुळे विद्यार्थ्यांनाही परीक्षेचे व अभ्यासाचे वेध लागले आहे.

दिवाळीच्या सुट्ट्या, त्यानंतर १८ नोव्हेंबरला दुसऱ्या सत्रातील शाळा सुरू झाल्या. त्यातच १९ व २० नोव्हेंबरला निवडणुकीचे कार्य यात शिक्षक आतापर्यंत व्यस्त होते. यातच २१ नोव्हेंबरला बोर्डाने दहावी - बारावीचे अंतिम वेळापत्रक बोर्डाच्यावेबसाइटवर उपलब्ध करून दिले आहे. परीक्षा यंदा दहा दिवसांआधी असल्यामुळे, शिक्षकांना बारावी व दहावीचा अभ्यासक्रम यंदा लवकर पूर्ण करावा लागणार आहे, तर पालकही आपल्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासाबाबत जागरूक झाले आहेत, तर



दुसरीकडे विद्यार्थ्यांनाही वेळापत्रक उपलब्ध झाल्यामुळे अभ्यासाचे वेध लागले आहे.

राज्य मंडळाने या आधी बारावी व दहावीचे अंतरिम वेळापत्रक जाहीर केले होते. वेळापत्रकावर नोंदविण्यात आलेल्या हरकती व सूचनांचा विचार करून वेळापत्रक अंतिम करण्यात आले.

बारावीची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन, तसेच एनए- सक्यूएफ अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा २४ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत होणार आहेत. दहावीच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा ३ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी या कालावधीत होणार आहेत. २१ नोव्हेंबरला मंडलाच्या अधिकृत संकेतस्थळावर वेळापत्रक विद्यार्थ्यांसाठी बोर्डाने उपलब्ध करून दिले आहे.

# पत्नी आजारी, मणक्याचा त्रास; इलेक्शन ड्युटी टाळण्यासाठी १५४९ जणांचे होते अर्ज

## ५३९ अर्ज केले मंजूर : १०१० जणांचे अर्ज रद्द केल्याने इलेक्शन ड्युटी करावीच लागली

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७ अमरावती ८

शासकीय नोकरी मिळविण्यासाठी अनेकांचा आटापिटा असतो. नोकरीवर लागेपर्यंत प्रत्येक जण मिळेल ते काम करण्याची इच्छा दर्शवितात, कुठेही नोकरीसाठी सहमती दर्शवितात. मात्र, नोकरी मिळाली की, यातील अनेक जण सेफ झोनमध्ये राहणेच पसंत करतात. यातून निवडणुकीकरिता नियुक्ती झाल्यावर ती टाळता कशी येईल, यासाठीही अनेकांचा प्रयत्न असतो. यासाठी थोडे थोडके नव्हे १५०० पेक्षा अधिक अर्ज दाखल करण्यात आले होते.

निवडणूक ड्युटी टाळण्यासाठी प्रत्येक अर्जात अफलातून कारणांची नोंद आहे. विधानसभा निवडणुकीसाठी मतदान पार पडले व शनिवारी (दि. २३) मतमोजणी झाली. मात्र, त्यापूर्वी मतदान ड्युटी नको यासाठी कर्मचाऱ्यांनी दिलेली अनेक कारणे हास्यास्पद असल्याचे समोर आले आहे; परंतु बहुतांश जणांनी निवडणुकीचे कर्तव्य इमानेइतबारे पार पाडले असल्याचेही दिसून आले.



### ड्युटी टाळण्याची ही होती कारणे?

शुगर आणि बीपीचा प्रॉब्लेम आहे, चक्कर येतात, पत्नी आजारी आहे. आई-वडील आजारी आहेत. या प्रमुख कारणाने ड्युटी टाळण्यासाठी अनेक कर्मचाऱ्यांचे अर्ज आले. काही कर्मचाऱ्यांनी भावाचे लग्न आहे. भाच्याचे लग्न आहे. पुतण्याचे लग्न आहे. मुलीचे लग्न आहे. आई- वडील आजारी आहेत, अशी अनेक कारणे सांगितली. मुलांकडे लक्ष देण्यासाठी कोणीही नसल्याचे अनेकांनी कारण सांगितले.

### दिव्यांग, स्तनदा, गर्भवती मातांना विशेष सवलत

स्तनदा माता, गर्भवती मातांना मतदानाच्या ठिकाणी नियुक्ती देऊ नये, अशा सूचना होत्या. त्यानुसार कर्मचाऱ्यांना सूट देण्यात आली. त्यामुळे महिला, दिव्यांग, गर्भवती मातांना विशेष सवलत मिळाली.

अमरावती जिल्ह्यात आठ विधानसभामतदारसंघांसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान झाले. शनिवारी मतमोजणी - झाली. मतदानासाठी बारा हजार ७१९अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती - करण्यात आली. यातील बहुतांश - कर्मचाऱ्यांना निवडणुकीच्या कर्तव्यावर जाण्याचे स्वारस्य नव्हते. अनेक कर्मचाऱ्यांनी पोलिंग पार्टी रवाना होताना नियोजित स्थळी न जाण्याचाच सूर आळवला. मात्र, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांना कर्तव्यावर - जाण्याच्या सूचना दिल्या. तर, काहींना नोटीस बजावण्याचे फर्मानही काढले.

# सहलीचे नियोजन करा; एसटीकडून सवलत मिळवा

## सहलीपूर्वी शिक्षण विभागाचे निर्देश पाळणे बंधनकारक

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७अमरावती

शालेय सहलीसाठी एसटी महामंडळाकडून प्रवास भाड्यात सुमारे ५० टक्के सवलत दिली जाते. त्यामुळे शाळांकडूनही एसटीलाच पसंती मिळते. यंदाही सवलत कायम आहे. मात्र, ही सहल काढण्यापूर्वी शिक्षण विभागाचे निर्देश संबंधित शाळेला पाळावे लागणार आहे. तरच त्यांना परवानगी मिळते. दुर्दैवाने अपघातासारखी एखादी घटना घडल्यास त्यानुसार जबाबदारी निश्चित केली जाते.

साधारणपणे डिसेंबर महिन्यापासून शैक्षणिक सहली निघण्यास सुरुवात होते. एसटी महामंडळाने शालेय सहलीसाठी प्रवास भाड्यात घसघशीत५० टक्के सवलत जाहीर केलेली



आहे. ही सवलत यंदाही कायम ठेवण्यात आलेली आहे. गतवर्षी सहलीच्या माध्यमातून एसटीच्या उत्पन्नात बऱ्यापैकी भर पडली होती. यंदाही या सवलतीचा चांगला फायदा होईल, असे महामंडळाचे म्हणणे आहे. दरम्यान, शिक्षण विभागाने सहल काढण्यासाठी शाळांना काही अटी घातल्या आहेत.

### शिक्षणाधिकाऱ्यांची परवानगी

सहलीच्या नियोजनापूर्वी संबंधित शाळेला शिक्षणाधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागते. परवानगी नसेल तर सहल काढता येत नाही. शिक्षणाधिकारीही शाळेकडून सर्व अटींची पूर्तता आली असेल तरच परवानगी दिली जाते.

### मुख्याध्यापकांची जबाबदारी अधिक

शैक्षणिक सहल काढायची म्हटलं की, मुख्याध्यापकांवर जबाबदाऱ्यांची जंत्री समोर येते. सर्वप्रथम त्यांना शिक्षणाधिकारी कार्यालयाची परवानगी घ्यावी लागते. ही परवानगी घेताना अटींची पूर्तता करावीच लागते.

परवानगी मिळाल्यानंतर महामंडळाकडून पट्टीतील चालक उपलब्ध करून घेण्यापासून ते सुस्थितीतील बस मिळविण्यापर्यंत तपासणी करावी लागते. सहल सुखरूप परत आल्यानंतर मुख्याध्यापक सुटकेचा श्वास सोडतात.

### ट्रॅव्हल्सपेक्षा एसटीलाच पहिली पसंती

एसटी महामंडळाकडून प्रवास भाड्यात ५० टक्के सूट दिली आहे. त्यामुळे शाळा एसटीलाच पसंती देतात. खासगी बस अशा स्वरूपाची सूट देत नाहीत. सोबतच बसची अवस्था, सोयीसुविधांचा ही विचार केला जातो.

### विद्यार्थ्यांच्या सहलीसाठी ५० टक्के सवलत

हिवाळा सुरू झाला की, शैक्षणिक सहली निघण्यास सुरुवात होते. यंदाही अनेक शाळांकडून सहलीचे नियोजन करण्यात येऊ लागले आहे.

मागील वर्षाप्रमाणेच यंदाही प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत कायम आहे. त्यामुळे शाळांकडून एसटी महामंडळाच्या बसलाच प्राधान्य दिले जाऊ लागले आहे.

### सहलीसाठी यांची सहमती आवश्यक

पालकांचे संमतीपत्र शैक्षणिक सहल काढण्यापूर्वी संबंधित पाल्याच्या पालकांचे संमतीपत्र घेतले जाते. ते बंधनकारक आहे. शाळेकडून प्रत्येक विद्यार्थ्यांचे संमतीपत्र घेतले जाते. जे पालक संमतीपत्र देत नाहीत, त्यांच्या पाल्यांना सहलीसाठी नेले जात नाही.

# लोकसभेला दिले; विधानसभेला पाडले! जिल्ह्यातील मतदार संघांची किमया

## मतदारराजाला गृहीत धरणे पडतेय महागात

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७ अमरावती

लोकसभा निवडणुकीत ज्या विधानसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मताधिक्य होते, त्याच मतदारसंघात आता विधानसभेला महायुतीच्या उमेदवारांना बळ दिले आहे. त्यामुळे लोकसभेला मताधिक्य दिलेल्या मतदारसंघांनीच विधानसभेला मात्र महाविकास आघाडीच्या उमेदवारांना पाडल्याचे चित्र दिसून आले.

लोकसभा निवडणुकीत अमरावती लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचे उमेदवार बळवंत वानखडे यांनी विजय मिळविला होता. मेळघाट,तिवसा,अचलपूर अमरावती या विधानसभा मतदार संघात मतांची आघाडी घेतली होतीपण यानंतर सहा महिन्यांनी झालेल्याविधानसभा



निवडणुकीत काँग्रेसला हे मताधिक्य कायम ठेवता आले नाही. अमरावती,तिवसा, अचलपूर, आणि मेळघाट यामतदारसंघातून मताधिक्य न मिळालेल्या काँग्रेसचे चारही उमेदवारांचा दारुण पराभव झाला.सहा महिन्यांतच हे चित्र पालटल्याने आणि मतदारांना गृहीत धरणे महाविकास आघाडीला चांगलेच अंगलट आले. तर काही मतदार संघात अति आत्मविश्वास ही अंगलट आला.त्यामुळे अमरावती विधानसभा मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या महायुतीच्या उमेदवार सुलभा खोडके यांचा विजय झाला तर तिवसा मतदार संघातून राजेश वानखडे विजयी झालेत तर अचलपूर विधानसभा मतदार संघातून प्रवीण तायडे हे विजयी झालेत तर मेळघाट मधून केवलराम काळे विक्रमी मतांनी विजयी झालेत.

# डॉ.अनिल बोंडे यांची जेएनयूच्या कोर्ट समितीवर नियुक्ती

## उपराष्ट्रपतीकडून अधिसूचना जारी : अमरावतीला मोठा बहुमान

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२७ अमरावती

गुणवत्तापुर्ण शिक्षणात देशात अग्रेसर असलेले नवी दिल्ली येथील देशातील प्रथम क्रमांकाचे विद्यापीठ असलेल्या जवाहरलाल नेहरू (JNU) विद्यापीठाच्या कोर्ट समितीवर देशातील भाजपच्या तीन खासदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातून राज्यसभा सदस्य डॉ.अनिल बोंडे यांची या समितीवर वर्णी लागली आहे. तशी अधिसूचना देखिल उपराष्ट्रपती महोदयांकडून काढण्यात आली आहे. बोंडेंच्या निमित्ताने अमरावतीला हा मोठा बहूमान मिळाला आहे.

नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठ हे देशातील प्रथम क्रमांकाचे विद्यापीठ आहे. जेएनयूमध्ये शिक्षण घ्यावे हे प्रत्येक भारतीय विद्यार्थ्यांचे स्वप्न असते. त्याच विद्यापीठाच्या कोर्ट समितीवर भाजपचे ज्येष्ठ नेते तथा



राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांची उपराष्ट्रपती जगदिप धनकड यांनी नियुक्ती केली आहे. देशातील तीन खासदारांची नियुक्ती या कोर्ट समितीवर केंद्र सरकारने केली आहे. त्यामध्ये के.लक्ष्मण, समिरसिंह सोलंके या दोघांचा समावेश आहे. अनिल बोंडे यांची या समितीवर नियुक्ती झाल्यामुळे भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.ही जबाबदारी असते कोर्ट समितीकडे?जेएनयूचे वार्षिक अहवाल व लेखे तयार करणे, लेखापरिक्षण अहवाल, जेएनयूच्या बजेटवर चर्चा करणे तसेच विद्यापीठाची सर्वोच्च असलेली कार्यकारी परिषद, शैक्षणिक परिषदेच्या कृतीचे अवलोकन करण्याचे अधिकारी या न्यायिक समितीला आहेत.

### सर्वसमावेशक कार्याची उपराष्ट्रपतीकडून नोंद

डॉ.अनिल बोंडे हे राजकारणामध्ये प्रवेश करण्यापूर्वी शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत होते. औषध वैद्यक शास्त्रात पदव्युत्तर पदवी घेतलेल्या अनिल बोंडे यांनी अनेक ठिकाणी अध्यापनाचे कार्य केले. शिक्षण, संशोधन तसेच वैद्यकीय क्षेत्रात अमुलाग्र बदल घडून आणण्यात त्यांचा महत्वाचा वाटा आहे. रुग्ण सेवा आणि रुग्ण कल्याणाच्या चळवळीतही त्यांचे उल्लेखनीय योगदान आहे. याच सर्वसमावेशक सामाजिक, शैक्षणिक कार्याची दखल उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांनी ही नियुक्ती करताना लक्षात घेतली आहे.

# उद्याला स्वीप अंतर्गत सन्मान सोहळा

## जिल्हाधिकारी यांचे प्रमुख उपस्थितीत जिल्हा परिषद येथे आयोजन

विदर्भ प्रजासत्ताक
दि. २७ अमरावती

दिनांक २० नोव्हेंबर रोजी राज्यात विधानसभा निवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीत अमरावती जिल्ह्याची मतदानाची टक्केवारी गत निवडणुकीच्या तुलनेत उंचावली असल्याने यासाठी स्वीप व्यवस्थापन कक्षाने महत्वाची भूमिका बजावली. निवडणूक जनजागृतीसाठी महत्वाची भूमिका बजावणाऱ्या सर्व घटकांचा सन्मान व्हावा यासाठी दिनांक २८ नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्हा परिषद सभागृहअमरावती येथे दुपारी चार वाजता प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या प्रमुख उपस्थितीत, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, सहा.जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी मिन्नू पी, परिविक्षाधिन सहायक जिल्हाधिकारी अमर राऊत आदींची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे. महाराष्ट्र सार्वत्रिक निवडणूक २०२४ अमरावती जिल्हयाकरीता मतदार जनजागृती करीतास्वीप व्यवस्थापन कक्षामार्फत आठ मतदार संघात विविध नाविण्यपूर्ण उपक्रम घेण्यात आले आहेत.